दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ७ वे | पाने ८ | मुल्य रू. ४.०० | अंक २१३ | रविवार १७ मे २०२६
| पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 | www.rashtrasahyadri.com



'सहजयोग'
भाग ५४

**परमात्म्याचा बोध...** बुद्धीने परमात्मा जाणता येणार नाही, पण बुद्धीच्या जोरावर तुम्ही अशा ठिकाणी नक्कीच पोहोचू शकाल जिथे तुम्हाला जाणवेल की बुद्धीने परमात्म्याला जाणता येत नाही. पण याचा अर्थ असा नाही की तुम्ही बुद्धीचा त्याग करावा; बुद्धीचा त्याग करा असे मी म्हणत नाहीये. बुद्धी तिथे पूर्णपणे तशीच राहील, पण तुम्हाला 'बोध' व्हायला हवा. ज्ञान ही एक गोष्ट आहे आणि 'बोध' होणे ही दुसरी गोष्ट आहे. जेव्हा परमात्म्याचा बोध होतो, तेव्हा तो केवळ प्रवचन दिल्याने किंवा तुमचे 'ब्रेन वॉश' केल्याने होणार नाही. ही एक घटना आहे जी तुमच्या आत घडली पाहिजे; तुम्हाला ते व्हावे लागेल, तुम्हाला 'आत्मामय' व्हावे लागेल. जोपर्यंत ते घडत नाही, तोपर्यंत कोणत्याही गोष्टी करणे व्यर्थ आहे. या क्षणी तर मी तुम्हाला फक्त तिथपर्यंत पोहोचवत आहे, जिथे तुम्हाला उभे राहून ती घटना तुमच्या आत घडण्याची प्रतीक्षा करावी लागेल.आता दुसरी समजून घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, यासाठी तुम्ही स्वतःहून काही करू शकत नाही आणि कोणत्याही प्रकारे तुम्ही याला विकत घेऊ शकत नाही. ही गोष्ट सांगतानाही मला थोडे विचित्र वाटते, पण अनेक लोकांना असे वाटते की ते परमात्म्याला विकत घेऊ शकतात; त्यासाठी पैसे देऊ शकतात किंवा कुणाकडून तरी ते करून घेऊ शकतात.एखादी पूजा केली की काम संपले, असे त्यांना वाटते. पण असे होऊ शकत नाही. आपण इतक्या वरवरच्या पातळीवर जगतो की आपल्याला हेच माहित नाही की अशा कामांनी कधी सत्य प्राप्त करता येते का?१६/०१/१९७९ बोरिवली अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..

### महाराष्ट्रात शेतकऱ्यांसाठी स्थापन झाली स्वतंत्र वीज कंपनी

मुंबई : राज्यातील कृषी वीजपुरवठ्यासाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याचा मोठा निर्णय राज्य सरकारने घेतला असून महावितरणच्या पुनर्रचनेची अधिकृत अधिसूचना शुक्रवारी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली. यानुसार कृषी ग्राहकांचे बिलिंग, वसुली, अनुदान व्यवस्थापन आणि वीजपुरवठ्याशी संबंधित कारभार 'एमएसईबी सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड' या नव्या संस्थेकडे सोपविण्यात येणार आहे. मात्र वीज वितरण यंत्रणा, वीजवाहिन्या आणि पायाभूत सुविधा महावितरणकडेच राहणार असून नवी व्यवस्था १ एप्रिल २०२६ पासून लागू मानली जाणार आहे. राज्यातील कृषी वीजपुरवठा स्वतंत्र पद्धतीने हाताळण्यासाठी महावितरणचे विभाजन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. त्यासाठी 'महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीची पुनर्रचना आणि हस्तांतरण योजना, २०२६' ही अधिसूचना शुक्रवारी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली.

# ५८ लाख मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या

## ३० मे पासून मनोज जरांगे पाटलांचा पून्हा आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जालना :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा रणशिंग फुंकले आहे.

३० मे पासून मनोज जरांगे पाटील हे आंतरवाली सराटीत पुन्हा आमरण उपोषणाला बसणार आहेत. मराठा आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे बोलावलेल्या बैठकीत त्यांनी ही घोषणा केली आहे.

### माझ्या विरोधात बोलण्यासाठी २-२ कोटी रुपये



**एका मंत्र्याने माझ्या विरोधात बोलण्यासाठी २-२ कोटी रुपये दिले. मला माहिती कळाली. १६ संघटनांना पैसे दिले. त्यातील एक व्यक्ती इमानदार निघाला त्याने मला सांगितले. काही संघटनांची प्रेस ठरली होती. त्याचे पुढे काय झाले हे मला माहिती नाही, असा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केलाय. तर समाजाने खोट्या गोष्टीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करताना आंदोलनाच्या तारखेच्या आत सगळ्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या, नाहीतर भयानक आंदोलन होईल, असा इशारा देखील त्यांनी दिला.**

### ... तर मी राजीनामा द्यायला तयार : विखे पाटील

मराठा आरक्षणाच्य मुद्द्यावर राज्याचे जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मोठे वक्तव्य करता आपल्या पदाला चिकटून बसणाऱ्यापैकी नसल्याने स्पष्ट केले. उपस समितीच्या अध्यक्षपदाचा माझा राजीनामा दिल्याने जरंगे पाटलांचे समाधान होत असेल, तर मी राजीनामा द्यायला तयार आहे, असे ठाम विधान करत विखे पाटील यांनी मराठा समाजासाठी सरकारने केलेल्या कामाचा पाढाच वाचला.

### मनोज जरांगे यांच्या १० मागण्या

**१) मराठवाड्यातील सर्व मराठ्यांना २९ मे च्या आता कुणबी प्रमाणपत्र द्या.**
**२) सातारा, कोल्हापूर, औंध आणि पुणे, मिरज संस्थांचा जीआर काढा. १९९४ च्या धर्तीवरच जीआर काढा.**
**३) महाराष्ट्रातील सर्व सरसकट गुन्हे मागे घ्या.**
**४) आंदोलनात बलिदान देणाऱ्या कुटुंबीयांना महावितरण आणि एमआयडीसी मध्ये नोकरीचा जीआर काढा.**
**५) सारथीच्या सर्व योजना पुन्हा सुरू करा.**
**६) महामंडळाचे सर्व परतावे ताबडतोब वाटप केले पाहिजे.**
**७) कुणबी प्रमाणपत्र दिलेले त्याची व्हॉलिडिटी द्या.**
**८) मराठा उपसमिती काही कामाची नाही, अध्यक्षाला काम नाही. उपसमिती बरखास्त करा.**
**९) स्वतंत्र कुणबी आणि मराठा मंत्रालय स्थापन करा.**
**१०) शिंदे समितीला मुदतवाढ देऊन रेकॉर्ड तपासायला लावा.**

तीन कोटींपेक्षा जास्त मराठी आंदोलनात सहभागी होतील, असा दावा जरांगे पाटील यांनी केला आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आपण अडीच-तीन वर्षापासून लढत आहोत. समाजाच्या पदरात काय पडले? जून महिन्यात **(पान ४ वर)**

### पुन्हा नडलात, तर थेट भूगोलातून उडवू

## भारतीय लष्करप्रमुखांची पाकला युद्धाची धमकी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** पाकिस्तानला कडक लष्करी इशारा देताना भारतीय लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी शनिवारी स्पष्ट शब्दांत सांगितले की, जर पाकिस्तानने दहशतवाद्यांना आश्रय देणे आणि भारताविरोधात कारवाया सुरूच ठेवल्या तर त्यांना भूगोलाचा भाग राहायचे की इतिहासजमा व्हायचे हे ठरवावे लागेल.

दिल्लीतील मानेकशॉ सेंटर येथे 'युनिफॉर्म अनव्हेल्ड'तर्फे आयोजित संवाद सत्रात ते बोलत होते. 'सेना संवाद' या कार्यक्रमादरम्यान त्यांना विचारण्यात आले की, गेल्या वर्षीच्या 'ऑपरेशन सिंदूर'सारखी परिस्थिती पुन्हा निर्माण झाली तर भारतीय लष्कराची भूमिका काय असेल?



यावर उत्तर देताना जनरल द्विवेदी म्हणाले, मी यापूर्वीही स्पष्टपणे सांगितले आहे की, जर पाकिस्तानने दहशतवाद्यांना आश्रय देणे आणि भारताविरोधात कारवाया करणे सुरू ठेवले, तर त्यांनी ठरवावे लागेल की त्यांना भूगोलात राहायचे आहे की इतिहासात नोंद व्हायची आहे. **(पान ४ वर)**

### नीट पेपरफुटी तपासाला वेग

## पुण्यातील प्राध्यापिकेला सीबीआयकडून अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** देशभर गाजत असलेल्या नीट-यूजी २०२६ पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाला केंद्रीय अन्वेषण विभागाने मोठी गती दिली असून पुण्यातील वरिष्ठ बॉटनी प्राध्यापिका मनीषा गुरुनाथ मांढरे यांना अटक करण्यात आली आहे. पेपरफुटी रॅकेटमधील प्रमुख सूत्रधारांपैकी एक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असून, यापूर्वी अटक करण्यात आलेल्या मनीषा वाघमारेनंतर ही मोठी कारवाई मानली जात आहे.

केंद्रीय अन्वेषण विभागाच्या माहितीनुसार, मनीषा मांढरे या राष्ट्रीय परीक्षा संस्थेकडून नीट-यूजी २०२६ प्रक्रियेत तज्ज्ञ म्हणून नियुक्त होत्या. त्यांना बॉटनी आणि झूलॉजी प्रश्नपत्रिकांमध्ये थेट प्रवेश होता. एप्रिल २०२६ मध्ये पुण्यातील काही विद्यार्थ्यांना संपर्क करून स्वतःच्या घरी विशेष कोचिंग क्लासेस घेतल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. या क्लासमध्ये संभाव्य प्रश्न विद्यार्थ्यांना लिहून घेण्यास सांगितले जात होते. विशेष म्हणजे त्यांनी दिलेले अनेक प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेत आल्याचा दावा विद्यार्थ्यांनी केला आहे.

मनीषा मांढरे या पुण्यातील मॉडर्न कॉलेजमध्ये गेली १८ वर्षे अध्यापन करत असून त्या सहा महिन्यांत निवृत्त होणार होत्या. दरम्यान, गेल्या २४ तासांत केंद्रीय अन्वेषण विभागाने देशभरातील सहा ठिकाणी छापेमारी करत महत्त्वाची कागदपत्रे, लॅपटॉप, मोबाईल आणि बँक व्यवहारांची माहिती जप्त केली आहे.

### बीड कनेक्शनही समोर

**या प्रकरणात आता बीड कनेक्शनही समोर आले आहे. लातूरमधून अटक करण्यात आलेले निवृत्त रसायनशास्त्र प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी हे मूळचे बीडचे असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्या या रॅकेटचे धागेदोरे महाराष्ट्रातील विविध भागांपर्यंत पोहोचल्याचे स्पष्ट झाले असून तपासात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.**

## निळवंडे उजव्या कालव्याच्या पाटात पडून युवकाचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मयत- प्रमोद भाऊसाहेब गिरी (वय ३४) राहणार नांदुरी दुमाला तालुका- संगमनेर**

**संगमनेर खुर्द :** संगमनेर तालुक्यातील नांदुरी दुमाला येथील एक ३४ वर्षीय युवक पाण्यात पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

दि.१६ मे रोजी सकाळी १०:३० सुमारास प्रमोद भाऊसाहेब गिरी (गोसावी) (वय ३४) राहणार नांदुरी दुमाला हा युवक निळवंडे कालव्याच्या पाण्यात तरंगत असताना काही ग्रामस्थांच्या लक्षात आल्याने तातडीने कामगार पोलीस पाटील संतोष कवडे, सरपंच निखिल निळे यांना कळविण्यात आले. लागलीच संगमनेर तालुका पोलीस स्टेशनला खबर देण्यात आली. दरम्यान प्रमोद भाऊसाहेब गिरी (मयत )यांना घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले डॉक्टरांनी उत्तरीय तपासणी करून त्यांना मृत घोषित करण्यात आले. घटनेचा अधिक तपास संगमनेर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे, यांच्या मार्गदर्शनाखाली ए.एम.महाजन,पोलीस हेड कॉन्स्टेबल जे. के. खेमनर हे करत असून, संगमनेर तालुका पोलीस स्टेशन मध्ये आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## टाकळीभानमध्ये खतांचा अवैध साठा पकडला

### गुन्हा दाखल : शिवशंभो कृषी सेवा केंद्र सील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांची अडवणूक करून रासायनिक खतांची बेकायदेशीर साठेबाजी करणाऱ्या विक्रेत्यांविरुद्ध कृषी विभागाने मोठी मोहीम हाती घेतली आहे. श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील मे. शिवशंभो कृषी सेवा केंद्रात युरियाचा साठा असूनही देखील तो दडवून ठेवल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी केंद्रचालक अमोल आबासाहेब तनपुरे यांच्याविरुद्ध खत नियंत्रण आदेश आणि अत्यावश्यक वस्तू अधिनियम ानुसार श्रीरामपूर तालुका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगळवारी अचानक ( दि.१२) मे रोजी कृषी विभागाच्या गुणनियंत्रण पथकाने टाकळीभान येथील संबंधित केंद्राची तपासणी केली. यावेळी दुकानाची व गोदामाची अचानक केंद्रात युरिया खताचा मोठा साठा उपलब्ध असल्याचे दिसून आले.

**खरीप काळात खंताची कुत्रिम टंचाई निर्माण करून साठेबाजी करणाऱ्या कृषी केंद्रांवर कारवाई करण्यात येईल. यात कृषी विक्रेत्यांची कोणत्या गय केली जाणार नाहीत. शेतकऱ्यांनी अधिकृत बिलाची मागणी करावी.**
**- अभय मच्छिंद्र थोरात**
**कृषी अधिकारी तथा गुणनियंत्रण अधिकारी**
**श्रीरामपूर**

मात्र, तपासणी दरम्यान अनेक गंभीर बाबी समोर आल्या असून शासकीय पीओएस मशीननुसार केंद्रात १५.७७ टन युरिया शिल्लक असणे आवश्यक होते. मात्र, प्रत्यक्ष साठा आणि नोंदवही यात कमालीची तफावत आढळून आल्याचे दिसून आले.१ एप्रिल २०२५ पासून १९.१२५ टन युरिया विक्री झाल्याचे मशीनवर दिसत होते. मात्र,विक्रीची नोंद होती. उर्वरित ८.९२ अवैध टन युरियाचा कोणताही हिशोब किंवा अधिकृत बिले केंद्रचालकाकडे आढळली आली नाहीत. केंद्रचालकाने जुलै २०२५ पासून ३८.३१ टन युरिया खरेदी केला होता. ऐन हंगामात शेतकऱ्यांना खत न प्रत्यक्ष कागदोपत्री केवळ १०.२२ टन विकता, तो गोदामात दडवून ठेवून कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे तपासात निष्पन्न झाले.याप्रकरणी कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) अभय थोरात यांनी दिलेल्या फिर्यादीवरून, खत नियंत्रण आदेश १९८५ मधील खंड ४ व ५, तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ मधील कलम ३ व ७ नुसार गुन्हा नोंदवण्यात आला.या कारवाईमुळे परिसरात खत दडवून ठेवणाऱ्या इतर विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

## पिण्याचे पाणी नाही मग बियाणे वाटप कशासाठी?

- ना. विखेंचा अधिकाऱ्यांना सवाल, निष्काळजीपणा खपवून घेणार नाही
- पारनेरच्या टंचाई बैठकीत विखेंचा रुद्रावतार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** पारनेर येथे दि.१६ मे रोजी सकाळी १२ वाजता प्रशासनाच्या घेतलेल्या टंचाई आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना राज्याचे जलसंपदा मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी चांगलेच धारेवर धरल्यामुळे तसेच अधिकाऱ्यांची मागची सवय अजून गेली नाही का..? असे सांगत आघाडी सरकारच्या काळातील बेपर्वा वागणाऱ्या अधिकाऱ्यांना पालकमंत्री ना. विखे यांनी चांगलेच ठोकून काढताना विखेंचा रुद्रावतार यावेळी दिसून आला.

यावेळी तालुक्यातील पिण्याचे पाणी, जनवारांना पिण्याचे पाणी, आणि जनवारांचा चारा प्रश्न आधी विषयावर आजची बैठक चांगलीच गाजली. पाणीपुरवठा,तालुक्यातील टँकर व्यवस्थापन व पशुधन चारा उपलब्धतेचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर पालकमंत्री



राधाकृष्ण विखे पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत अधिकाऱ्यांना अक्षरशः धारेवर धरले. यावेळी अधिकाऱ्यांची कानउघाडणी करताना आता निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही असा सज्जड दम विखेपाटलांनी प्रशासनाला दिला.

यावेळी अधिकाऱ्यांकडून सध्यपरिस्थिती मधे २० टँकरद्वारे ५५ खेपा सुरू असल्याची माहिती देण्यात आली.मात्र १० गावांसाठी टँकर उपलब्ध नसल्याचे चित्र उघड झाले.यावेळी अजून २६ टँकर सुरू करण्याची गरज असल्याचे कार्यकर्त्यांनी सुचवीले. यावेळी कान्हूर पठार व दरोडी परिसरातील टँकर खेपा कायमस्वरूपी नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार नागरिकांनी केली.

यावेळी टँकरच्या खेपा वाढवून, नवीन टँकर तातडीने उपलब्ध करून द्यावेत, तसेच नवीन ठेकेदार टँकर देत नसल्यास जुन्या ठेकेदारांकडून टँकर घेण्याच्या सूचना यावेळी पालकमंत्र्यांनी दिल्या. टँकर बाबतच्या हलगर्जीपणाबद्दल ठेकेदारालाही सुचना देण्यात आल्या.

यावेळी बोलताना टँकर गावात आल्यावर तलाठी व ग्रामसेवक उपस्थित राहणे बंधनकारक आहें असे सांगत तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांनी वेळापत्रक जाहीर करावे,, अन्यथा जबाबदारी निश्चित करून कारवाई अटळ आहें,असा इशाराही त्यांनी दिला. यापुढे निष्काळजीपणा अज्जीबातही खपवून घेतला जाणार नाही, असेही पालकमंत्री म्हणाले.


याबैठकीत पशुसंवर्धन विभागाच्या कामकाजावरही तीव्र नाराजी व्यक्त केली.१५ जुलैपर्यंत पुरेल इतका चारा आपल्याकडे उपलब्ध असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.मात्र शेतकऱ्यांना **(पान ४ वर)**

## तिसऱ्या मुलासाठी ३० हजार तर चौथ्या मुलासाठी ४० हजारांचा प्रोत्साहन भत्ता

### आंध्र प्रदेशात चंद्रबाबू सरकारचा निर्णय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**विजयवाडा :** राज्यातील लोकसंख्या कमी होत असल्याने त्यात वाढ व्हावी म्हणून आंध्र प्रदेश राज्य सरकारकडून पालकांना प्रोत्साहन भत्ता दिला जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी शुक्रवारी केली. त्यानुसार, तिसऱ्या मुलाला जन्माला घालणाऱ्यांना ३० हजार रुपयांचा प्रोत्साहन भत्ता दिला जाईल. तर, चौथ्या मुलाला जन्म देणाऱ्यांना ४० हजार रुपयांचा भत्ता दिला जाईल. चंद्राबाबू नायडू यांनी श्रीकाकुलम जिल्ह्यातील नरसण्णपेटा येथे कार्यक्रमात बोलताना यासंदर्भात घोषणा केली.



चंद्राबाबू नायडू यांच्या सरकारकडून या योजनेसंदर्भातील सविस्तर नियम आणि अटी येत्या महिन्याभरात जाहीर केल्या जातील. स्वर्ण आंध्र आणि स्वच्छ आंध्र स्वच्छता कार्यक्रमात नायडू बोलत होते. चंद्राबाबू नायडू यांनी काही वर्षांपूर्वी लोकसंख्या नियंत्रणाचं समर्थन केलं होतं. मात्र, आता जन्म दर वाढवण्यासाठी समाजानं एकत्र आलं पाहिजे, असं नायडूंनी म्हटलं. चंद्राबाबू नायडू यांनी काही दिवसांपूर्वी दुसऱ्या मुलाच्या जन्मासाठी २५ हजार रुपयांचा प्रोत्साहन भत्ता देण्याची घोषणा केली होती.

चंद्राबाबू नायडू यांच्या मते, बदलत्या सामाजिक आणि आर्थिक ट्रेंडमधील बदलाचा कुटुंबाच्या आकारावर परिणाम होतं आहे. अनेक जोडपी एका मुलाचा पर्याय स्वीकारत आहेत. तर, काही लोकं पहिली मुलगी असल्यास दुसऱ्या मुलाला प्राधान्य देत आहेत. यामुळं लोकसंख्येच्या वाढीचा दरात घसरण होत असल्याचं त्यांनी म्हटलं. एकूण २.१ असा जन्मदर कायम राखण्याची गरज आहे. अन्याथा लोकसंख्या घटेल आणि वयस्कर समाजामुळं अनेक देशांच्या आर्थिक विकासावर परिणाम होऊ शकतो, असे चंद्राबाबू म्हणाले.

## संपादकीय

# पुनर्मिलन की सत्तेचा नवा डाव..?

शरद पवार आणि अजित पवार यांच्या राजकीय प्रवासाने महाराष्ट्राच्या राजकारणाला गेल्या दोन दशकांत वेगळी दिशा दिली. पण अजितदादांच्या अचानक निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये निर्माण झालेली पोकळी आता केवळ भावनिक राहिलेली नाही, तर ती संघटनात्मक आणि नेतृत्वाच्या संघर्षात परिवर्तित होताना दिसत आहे. अधिकृत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकारिणीच्या यादीतून उघड झालेली अंतर्गत नाराजी ही त्याचीच स्पष्ट चिन्हे आहेत. एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेस म्हणजे शरद पवारांचे राजकीय शह-काटशहाचे विद्यापीठ मानले जात होते. त्या पक्षात प्रत्येक नेत्याचा सन्मान राखला जातो, अशी प्रतिमा होती. पण आज त्याच पक्षात काही वरिष्ठ नेत्यांच्या नावासमोर पदांचा उल्लेख नसणे, तर दुसरीकडे नव्या पिढीतील नेत्यांना पदे मिळणे, हा केवळ तांत्रिक दोष मानणे भोळेपणाचे ठरेल. विशेषतः सुनील तटकरे यांच्यासारख्या अनुभवी नेत्याच्या नावासमोर प्रदेशाध्यक्ष पदाचा उल्लेख नसणे, तर पार्थ पवार आणि जय पवार यांना थेट जनरल सेक्रेटरी म्हणून पुढे आणणे, हा पक्षातील नव्या सत्ताकेंद्रांचा संदेश मानला जात आहे.

राजकारणात प्रतीकांना खूप महत्त्व असते. निवडणूक आयोगाकडे पाठवलेले केवळ प्रशासकीय दस्तऐवज नसतो; तो पक्षाच्या भविष्यातील नेतृत्वाचा आरसा असतो. त्या आरशात जर जुन्या चेहऱ्यांची छाया फिकी आणि नव्या वारसदारांची प्रतिमा ठळक दिसू लागली, तर नाराजी अपरिहार्य ठरते. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सध्या तेच घडताना दिसत आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पक्षाची धुरा सांभाळल्यानंतर झालेले बदल स्पष्टपणे जाणवतात, हे नाकारण्याजोगे मुळीच

सुप्रिया सुळे आणि पवार कुटुंबाच्या पुढील पिढीभोवती केंद्रित होणारे राजकारण आता अधिक स्पष्टपणे पुढे येत आहे. पण राष्ट्रवादी काँग्रेस हा केवळ कौटुंबिक वारशावर उभा राहिलेला पक्ष नाही; तो अनेक प्रादेशिक नेते, सहकारी चळवळीतील कार्यकर्ते आणि ग्रामीण सत्ताकेंद्रांच्या जोरावर वाढलेला पक्ष आहे. त्यामुळेच दादा असताना असं काही घडत नव्हतं ही आता अनेक जुन्या नेत्यांच्या मनात घर करू लागल्याचे दिसते.

या पार्श्वभूमीवर सुनील तटकरे यांनी सिल्व्हर ओकवर जाऊन शरद पवारांची घेतलेली भेट राजकीय नसल्याचा दावा केला असला, तरी महाराष्ट्राच्या राजकारणात योगायोगांवर फारसा विश्वास ठेवला जात नाही. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकारणात तर प्रत्येक भेट, प्रत्येक शांतता आणि प्रत्येक सूचक विधान यामागे राजकीय संदेश असतो. तटकरे-पवार भेटीमुळे दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येणार का? हा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

दरम्यान, पक्षाचे जनरल सेक्रेटरी अविनाश आदिक यांनी यासंदर्भात पत्रकार परिषद घेऊन प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे हे पक्षाचे सर्वोच्च नेते आहेत त्यांचे पद आणि मानसन्मान पूर्वीप्रमाणेच असल्याचे सांगून प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न त्यांचा प्रयत्न किती यशस्वी होतो? हे येत्या काळात स्पष्ट होईलच.

प्रत्यक्षात पाहता, राष्ट्रवादी काँग्रेसचे विभाजन हे केवळ वैचारिक नव्हते; ते सत्तेच्या समीकरणातून निर्माण झालेले विभाजन होते. भाजपसोबत जाण्याचा निर्णय आणि त्यानंतर निर्माण झालेली राजकीय परिस्थिती यामुळे दोन राष्ट्रवादींची निर्मिती झाली. त्यामुळे या दोन गटांचे पुनर्मिलन होण्यासाठी भावनिक जवळीक पुरेशी नाही. त्यासाठी स्पष्ट राजकीय भूमिका आवश्यक आहे. म्हणूनच रोहित पवार यांनी भाजपविरोधी भूमिका घेतल्याशिवाय एकत्र येणे शक्य नाही असे स्पष्ट विधान केले आहे.

हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण महाराष्ट्रातील सध्याचे राजकारण हे विचारधारेपेक्षा सत्तेच्या अंकगणितावर अधिक आधारलेले दिसते. शिवसेनेचे विभाजन, राष्ट्रवादीचे विभाजन आणि त्यानंतर बदललेली सत्तासमीकरणे पाहता, मतदारांमध्ये निष्ठांबद्दल संभ्रम निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत जर दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र आल्या, तर त्यामागे विचारांची एकजूट असेल की केवळ राजकीय अस्तित्व टिकवण्याची धडपड, हा प्रश्न उपस्थित होणारच.

आज राष्ट्रवादी काँग्रेससमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे नेतृत्वाचा संक्रमणकाळ. शरद पवारांच्या करिष्म्याने पक्ष अनेक संकटांतून बाहेर पडला. अजित पवारांनी संघटन आणि समतोल राखला. पण आता नव्या पिढीकडे नेतृत्व जात असताना जुन्या नेत्यांचा विश्वास टिकवणे हे मोठे आव्हान ठरणार आहे. अन्यथा पक्षातील अंतर्गत नाराजी अधिक तीव्र होऊ शकते.

महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस हा केवळ एक पक्ष नाही, तर सहकार, ग्रामीण सत्ताकारण आणि मराठा नेतृत्वाचा महत्त्वाचा केंद्रबिंदू राहिला आहे. त्यामुळे या पक्षातील हालचालीचा परिणाम राज्याच्या व्यापक राजकारणावर होणार आहे. पुढील काही महिन्यांत दोन्ही राष्ट्रवादींच्या बैठका, नेत्यांच्या भेटीगाठी आणि सार्वजनिक वक्तव्ये यावरून पुढील दिशा स्पष्ट होईल.

पण एक गोष्ट निश्चित आहे की, अजितदादांच्या अनुपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये निर्माण झालेली सत्तेची पोकळी आता उघडपणे दिसू लागली आहे. ही पोकळी संवादाने भरून निघते की संघर्षाने, राष्ट्रवादी काँग्रेसचे भविष्य अवलंबून असेल.

# फक्त शिबिराच्या दिवशीच नाही तर वर्षभर प्रामाणिकपणे काम करा : आ.आशुतोष काळे

## महाराजस्व समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** गाव-खेड्यातील नागरिकांच्या प्रशासकीय कामांच्या अडचणी तातडीने सोडवण्यासाठी मंडळ स्तरावर महायुती शासनाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान हाती घेतले आहे. आज कागदपत्र करून जर नंतर दाखले दिले जाणार असेल तर या शिबिराचा काही उपयोग होणार नाही. या शिबिराच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न जागेवरच मार्गी लागले पाहिजे तरच या अभियानाचा उद्देश खऱ्या अर्थाने सफल होणार आहे. त्यासाठी महाराजस्व समाधान शिबिराचा जास्तीत जास्त नागरीकांना लाभ कसा करून देता येईल याची काळजी घ्या आणि फक्त शिबिराच्या दिवशीच नाही तर वर्षभर प्रामाणिकपणे नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी काम करा अशा सूचना आ.आशुतोष काळे यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिल्या आहे. तहसील कार्यालयाच्या वतीने कलश मंगल कार्यालय कोपरगाव येथे शनिवार (दि.१६) रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन तहसीलदार महेश सावंत यांच्या प्रमुख आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते पार पडले यावेळी मान्यवरांच्या हस्ते हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

> महायुती सरकारच्या माध्यमातून मागील सहा वर्षात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. या विकास कामांच्या माध्यमातून नागरिकांच्या मागील अनेक वर्षापासूनच्या अडचणी कायमच्या सुटल्या आहेत. त्यामुळे यापुढेही विकासकामे होणार आहेत त्या विकासकामांना अडथळा आणू नका.
>
> **आ. आशुतोष काळे**

यावेळी पुढे बोलताना आ.आशुतोष काळे यांनी सांगितले कि, महायुती शासन नागरिकांसाठी अनेक लोककल्याणकारी योजना राबवत आहे. या योजना नागरिकांपर्यंत पोहचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करून सर्वच योजना पात्र गरजू लाभार्थ्यांपर्यंत घटकापर्यंत पोहोचवून त्यांना लाभ मिळवून देण्यासाठी काम करणे गरजेचे आहे. नागरीकांना वारंवार शासकीय कार्यालयाच्या फेऱ्या मारायला लावू नका. शहराप्रमाणे ग्रामीण भागातील नागरिकांना देखील जलद सेवा द्या. गाव पातळीच्या अधिकाऱ्यांवर अधिक जबाबदाऱ्या असल्या तरी नागरिकांची कामे लवकरात लवकर मार्गी लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न करा.कोपरगाव तालुक्यात सर्वात जास्त बांधावरच्या रस्त्याचे प्रश्न सोडविल्याबद्दल विभागाचे त्यांनी कौतुक केले. आणि यापुढे अधिक सक्रीय राहून या शिबिराच्या माध्यमातून बांधावरचे भांडण बांधावर कसे सोडवता येतील आणि शेत रस्त्यांचे प्रश्न कसे मार्गी लावता येतील यासाठी प्रयत्न करा. शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहचला तरच हे अभियान यशस्वी होणार आहे याचे भान ठेवा असे आ.आशुतोष काळे यांनी यावेळी यावेळी आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते नागरिकांना विविध शासकीय योजनांचे लाभ तसेच आवश्यक दाखल्यांचे वाटप करण्यात आले. शिबीरस्थळी महिला बचत गटांनी उभारलेल्या विविध उत्पादनांच्या व व्यवसायाच्या स्टॉल्सना आमदार आशुतोष काळे यांनी भेट देत महिलांशी संवाद साधला. याप्रसंगी विधानपरिषद आमदार विवेक कोल्हे, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव धरमचंद कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक दिनार कुदळे,दिलीपराव बोरनारे, श्रावण आसने, शंकरराव चव्हाण, विष्णू शिंदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती गोवर्धन परजणे, नगरसेवक मंदार पहाडे, हाजीमेहमूद सय्यद, राजेंद्र वाकचौरे, शैलेश साबळे, विजय त्रिभुवन, वाल्मिक लहिरे, सोमनाथ आढाव, बाळासाहेब रुईकर, माजी नगरसेवक विरेन बोरावके, फकीर कुरेशी, अजीज शेख, सचिन सुनिल फंड, गणेश बोरुडे, चंद्रशेखर म्हस्के, अशोक आव्हाटे, संतोष शेलार, मुकुंद भूतडा, नितीन बोरुडे, आकाश डागा, जावेद शेख, सचिन परदेशी, राजेंद्र खैरनार, दादा पोटे, ठकाजी लासुरे, राजेंद्र आभाळे, प्रदीप कुऱ्हाडे, भाऊसाहेब भाबड, तन्मय साबळे, प्रकाश रुईकर, विशाल राऊत, बायजीत पठाण, बाळासाहेब शिंदे, रविंद्र राऊत, विनोद गलांडे, राजेंद्र तिरसे, सिद्धार्थ हर्षल कृष्णानी, महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी, स्थानिक पदाधिकारी, महिला बचत गटांच्या सदस्यांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



# प्राणिमित्र विकास म्हस्के यांचा जंगी मानद वन्यजीव रक्षकपदी नियुक्ती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

सोनगाव : प्रवरा परिसरातील प्राणिमित्र म्हणून ओळख असलेल्या विकास म्हस्के यांची महाराष्ट्र शासनाच्या वनविभागात मानद वन्यजीव रक्षक पदावर नियुक्ती झाल्यानंतर पाथरे बुद्रुक ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. गावातील सरपंच, उपसरपंच, मान्यवर नागरिक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत हा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. तीन वर्षांपासून राज्यातील मानद वन्यजीव रक्षक पदाच्या नियुक्त्या रखडल्या होत्या. मात्र ना. डॉ. राधाकृष्ण विखे यांनी विशेष लक्ष घालून प्राणिमित्रांना न्याय दिल्याने विकास म्हस्के यांच्या रूपाने प्रथमच प्रवरा परिसर व जिल्ह्याच्या उत्तर भागाला ही संधी मिळाली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे



परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला. सत्कार समारंभात सरपंच उमेश घोलप, उपसरपंच आरिफ शेख, प्र.रु.ए. सोसायटीचे संचालक आबासाहेब घोलप, दिलीप घोलप, सयाजी कडू, बाळासाहेब कडू, भास्कर घोलप, ताराचंद कडू, कैलास घोलप, सुरेश घोलप, बबन कडू, भाऊसाहेब शिंदे, शिवाजी घोलप, गंगाधर कडू, प्रविण घोलप, संतोष घोलप, दत्तात्रय कडू, राजेंद्र कडू यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त स्वप्निल कडू यांचाही ग्रामस्थांच्या वतीने गौरव करण्यात आला. तसेच दहावी परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या कृष्णा उमाकांत कडू आणि बारावी परीक्षेत प्रथम आलेल्या रिया शेख हिचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप घोलप सर यांनी केले, तर सयाजी कडू यांनी आभार मानले.

# अंधश्रद्धेवर प्रहार करणारी 'भोंदूची कमाल, पोलिसांची धमाल' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

प्रवरानगर : समाजातील वाढत्या अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीवर भाष्य करणारी 'भोंदूची कमाल, पोलिसांची धमाल' ही सामाजिक आशयाची शॉर्ट फिल्म लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. निर्माते आबा निर्मळ आणि दिग्दर्शक प्रमोद निर्मळ यांची जोडी स्वामी समर्थ प्रचिती' या गाजलेल्या प्रकल्पानंतर पुन्हा एकदा प्रभावी सामाजिक विषय घेऊन येत असल्याने चित्रपट क्षेत्रात या चित्रपटाची चर्चा सुरू झाली आहे. आजच्या विज्ञानवादी युगातही अनेकजण मानसिक तणाव, अपयश किंवा अडचणीमुळे तथाकथित भोंदू बाबांच्या जाळ्यात अडकत असल्याचे वास्तव या चित्रपटातून मांडण्यात आले आहे. भोंदूगिरीच्या नावाखाली गरिबांची आणि अडचणीत सापडलेल्या आर्थिक व मानसिक फसवणूक कशी केली जाते, याचे वास्तववादी चित्रण या शॉर्ट फिल्ममध्ये करण्यात आले आहे. निर्माते आबा निर्मळ आणि दिग्दर्शक प्रमोद निर्मळ यांनी सांगितले की, समाजातील सुशिक्षित लोकसुद्धा अंधश्रद्धेच्या आहारी जात असल्याची बाब चिंताजनक आहे. जर भोंदू बाबांकडे खरोखरच अलौकिक शक्ती असती, तर त्यांना लोकांच्या घरी जाऊन स्वतःची करण्याची गरज भासली नसती, असा विचार त्यांनी मांडला. या चित्रपटात एका बाजूला भोंदू बाबा आणि त्यांच्या गुंड प्रवृत्तीच्या साथीदारांचा काळा चेहरा दाखवण्यात आला असून दुसऱ्या बाजूला पोलीस यंत्रणा अशा फसवणूक करणाऱ्यांवर कशा प्रकारे कारवाई करते, हे दमदार शैलीत सादर करण्यात आले आहे. 'श्रद्धा देवावर ठेवा, भोंदूवर नको' हा चित्रपटाचा संदेश आहे. ज्ञानेश्वर साबळे, प्रमोद निर्मळ, ज्ञानेश्वर थोटे, ॲड. प्राजक्ता घोलप, मनीषा गुळवे, नरसिंहा सिंग, केशव पेहेरे, राजेंद्र पिंपळे आणि श्रीपाद बोकंद आदी कलाकारांनी चित्रपटात भूमिका साकारल्या आहेत. मनोरंजनासोबत समाजप्रबोधन करणारी ही शॉर्ट फिल्म प्रेक्षकांच्या मनात घर करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेस राष्ट्रस्तरीय सर्वोत्कृष्ट संशोधन केंद्राचा पुरस्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** जम्मू येथील शेर-ए-काश्मीर कृषि विज्ञान व विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय बियाणे विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थेच्या ४१ व्या वार्षिक बैठकीमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठातील बियाणे विभागातील बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेस सन २०२५-२६ या वर्षातील राष्ट्रीय पातळीवरील सर्वोत्कृष्ट संशोधन केंद्र म्हणून गौरविण्यात आले. सदरचा पुरस्कार नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे उपमहासंचालक (पीक शास्त्र) डॉ. डि.के. आणि जम्मू येथील शेर-ए-काश्मीर कृषि विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी.एन. त्रिपाठी यांच्या शुभहस्ते व नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे सहाय्यक महासंचालक (बियाणे) डॉ. पी.आर. चौधरी, उत्तर प्रदेशातील मऊ येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या राष्ट्रीय बियाणे विज्ञान व तंत्रज्ञान संस्थेचे प्रकल्प संचालक डॉ. ए. आनंदन यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. सदरचा पुरस्कार प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. नरेंद्र काशीद, बियाणे संशोधन अधिकारी डॉ. सुरेश झांजरे, डॉ. कैलास भोईटे, डॉ. अनिल सूर्यवंशी, डॉ. अविनाश कर्जुले, डॉ. रश्मी भोगे, डॉ. कैलास गागरे आणि डॉ. दीपक गायकवाड यांनी स्वीकारला. या वार्षिक आढावा बैठकीत बियाणे रोगशास्त्र विषयातील दोन, बियाणे प्रक्रिया विषयातील एक, बीजोत्पादन व प्रमाणिकरण या विषयातील एक, बियाणे कीटकशास्त्र या विषयातील एक अशा एकूण पाच शिफारशी




राष्ट्रीय स्तरावर प्रसारित करण्यात आल्या आहेत. या आधी या बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेने राष्ट्रीय स्तरावर ६८ तर राज्य स्तरावर २७ तंत्रज्ञान शिफारशी शेतकऱ्यांसाठी नियमित प्रसारीत केल्या आहेत. या योजनेस तीन वेळा राष्ट्रीय उत्कृष्ट संशोधन केंद्र म्हणून गौरविण्यात आले आहे. बीजोत्पादनातील विविध अडचणी समोर ठेवून त्यासंदर्भातील नियोजन व संशोधन कार्यात महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे आणि संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके तसेच सहयोगी संशोधन संचालक डॉ. विजय शेलार यांचे बहुमोल मार्गदर्शन व बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेच्या शास्त्रज्ञांनी या संदर्भात संशोधनकार्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

# क्रीडा ही करमणूक नाही, ती राष्ट्र उभारणीची ताकद

भारत हा युवकांचा देश म्हणून ओळखला जातो.देशातील मोठी लोकसंख्या ही तरुणांची आहे आणि हीच ताकद भारताचे भविष्य घडवू शकते. मात्र या तरुण शक्तीला योग्य दिशा देण्यासाठी शिक्षणाबरोबरच क्रीडेला देखील तितकेच महत्त्व देणे आवश्यक आहे. आजही आपल्या देशात अनेक शाळांमध्ये क्रीडेकडे फक्त रिक्रिएशन पीरियड विरंगुळ्याचा तास म्हणून पाहिले जाते. ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. कारण क्रीडा ही केवळ खेळ नसून राष्ट्रनिर्मितीची एक प्रभावी प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा अत्यंत आवश्यक आहे. वर्गात मिळणारे ज्ञान विद्यार्थ्यांना बौद्धिकदृष्ट्या सक्षम बनवते, तर मैदानावरचे शिक्षण त्यांना मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या मजबूत बनवते. खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, वेळेचे नियोजन, आणि संघभावना विकसित होते. मैदानावर प्रत्येक खेळाडू एकमेकांवर विश्वास ठेवायला शिकतो. पराभवानंतर पुन्हा उभे राहण्याची ताकद आणि विजय मिळवण्यासाठी सातत्याने मेहनत करण्याची वृत्ती क्रीडा शिकवते. आजच्या डिजिटल युगात मोबाईल, सोशल मीडिया आणि ऑनलाइन गेम्समुळे मुलांची मैदाने रिकामी होत चालली आहेत. शारीरिक हालचाली कमी झाल्याने लहान वयातच लठ्ठपणा, मधुमेह, तणाव मानसिक अस्थिरता वाढताना दिसत आहे. अशा परिस्थितीत क्रीडा ही निरोगी जीवनाची गुरुकिल्ली ठरू शकते. नियमित खेळामुळे शरीर तंदुरुस्त राहते, रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि मानसिक आरोग्य सुधारते. खेळणारी मुले अधिक आनंदी, आत्मविश्वासपूर्ण आणि सकारात्मक विचारांची असतात. क्रीडेमुळे युवक व्यसनाधीनतेपासून दूर राहतात, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. नशा ही आजच्या समाजासमोरील मोठी बनत आहे. अनेक तरुण चुकीच्या संगतीत जाऊन व्यसनांच्या आहारी जात आहेत. पण जो युवक मैदानावर घाम गाळतो, त्याच्याकडे चुकीच्या गोष्टींसाठी वेळच राहत नाही. खेळामुळे त्याची ऊर्जा योग्य दिशेने वापरली जाते. त्यामुळे क्रीडा ही समाजाला व्यसनमुक्त आणि सुदृढ बनवण्याचे प्रभावी माध्यम ठरू शकते. भारतात क्रिकेटला मोठी लोकप्रियता आहे, परंतु क्रीडा फक्त टीव्हीवर क्रिकेट पाहणे नाही. देशात कुस्ती, कबड्डी, हॉकी, व्हॉलीबॉल, फुटबॉल, ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, शूटिंग, बॅडमिंटन यांसारख्या अनेक खेळांमध्ये जागतिक दर्जाचे खेळाडू घडण्याची क्षमता आहे. ग्रामीण भागात प्रचंड नैसर्गिक प्रतिभा आहे, पण योग्य सुविधा आणि मार्गदर्शनाच्या अभावामुळे अनेक खेळाडू पुढे येऊ शकत नाहीत. त्यामुळे प्रत्येक गावात खेळाचे मैदान, प्रशिक्षक आणि सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. शाळा आणि महाविद्यालयांनी क्रीडेला अभ्यासाइतकेच महत्त्व दिले पाहिजे. अनेक पालक अजूनही खेळून काय मिळणार? असा प्रश्न विचारतात. पण आज क्रीडा क्षेत्रात करिअरच्या अमाप संधी उपलब्ध आहेत. खेळाडू, प्रशिक्षक, फिटनेस ट्रेनर, फिजिओथेरपिस्ट, स्पोर्ट्स मॅनेजमेंट, स्पोर्ट्स जर्नालिझम, पंच आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध क्षेत्रांमध्ये युवक आपले घडवू शकतात. त्यामुळे क्रीडेकडे केवळ छंद म्हणून नव्हे, तर करिअर आणि राष्ट्रसेवेचे प्रभावी माध्यम म्हणून पाहिले पाहिजे. सरकारने खेळो इंडिया, फिट इंडिया यांसारख्या मोहिमा सुरू केल्या आहेत, परंतु या उपक्रमांची खरी ताकद गावागावापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा, योग्य आहार, प्रशिक्षित मार्गदर्शक आणि आर्थिक मदत मिळाली भारत जगातील सर्वात मोठी क्रीडा शक्ती बनू शकतो. ऑलिम्पिकसारख्या स्पर्धांमध्ये भारताची पदकसंख्या वाढवायची असेल, तर शालेय स्तरापासून क्रीडा संस्कृती रुजवावी लागेल. क्रीडा ही राष्ट्रीय एकात्मतेचेही प्रभावी साधन आहे. मैदानावर जात, धर्म, भाषा किंवा आर्थिक स्तर यांना महत्त्व नसते. तिथे फक्त खेळाडू आणि त्याची मेहनत महत्त्वाची असते. त्यामुळे क्रीडा समाजात बंधुता आणि एकोप्याची भावना निर्माण करते. देशासाठी खेळताना प्रत्येक खेळाडूच्या मनात फक्त भारत असतो आणि हाच खरा राष्ट्रभक्तीचा भाव आहे. आजची गरज आहे की प्रत्येक पालकाने आपल्या मुलाला मैदानावर जाण्यास प्रोत्साहन द्यावे, प्रत्येक शाळेने क्रीडा सुविधा वाढवाव्यात आणि प्रत्येक गावाने खेळाडू घडवण्याचा संकल्प करावा. मुलांच्या हातात फक्त मोबाईल नव्हे खेळाचे साहित्यही दिसले पाहिजे. कारण मैदानावर धावणारी पिढीच देशाला उज्ज्वल भविष्य देऊ शकते. भारताला निरोगी, सक्षम, शिस्तबद्ध आणि व्यसनमुक्त राष्ट्र बनवण्यासाठी क्रीडा ही राष्ट्रीय चळवळ बनली पाहिजे. क्रीडा ही केवळ पदके जिंकण्यापुरती मर्यादित नसून ती एक सशक्त समाज आणि सामर्थ्यवान राष्ट्र घडवण्याची ताकद आहे. प्रत्येक युवक मैदानाशी जोडला गेला, शाळेत क्रीडा संस्कृती निर्माण झाली आणि प्रत्येक कुटुंबाने क्रीडेला पाठिंबा दिला, तर भारत जगातील सर्वात शक्तिशाली आणि निरोगी राष्ट्रांपैकी एक बनेल.

**गौरव अरविंद डेंगळे**
( FIVB Level १ व्हॉलीबॉल प्रशिक्षक)
8793321515

# कोल्हारमध्ये तास वाहतूक कोंडी

## वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक हैराण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** नगर-मनमाड राज्य मार्गाचे सुरू असलेले काम तसेच शनि अमावस्या असल्यामुळे शिर्डीहून शनिशिंगणापूर कडे जाणाऱ्या साई व शनी भक्तांच्या वाहनांची गर्दी शुक्रवारी रात्री टेम्पोचा झालेला अपघात या कारणामुळे शुक्रवारी रात्री तसेच आज शनिवारी सकाळी साडेनऊ वाजेपासून दुपारी चार वाजेपर्यंत वाहतुकीची कोंडी झाल्यामुळे नगर मनमाड राज्य मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यामुळे साई व शनि भक्त तसेच एसटी प्रवासी व कोल्हारकर नागरिक चांगलेच हैराण झाले. एसटी बस वाहतूक कोंडीत अडकल्याने एसटीतील प्रवासी व साई शनि भक्त उकाड्याने हैरान झाले झाले. पोलीस मित्र रामराजे गायकवाड सकाळी दहा नंतर येथील आनंदऋषीजी चौकात उभे राहून वाहतूक सुरळीत करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले पाच ते सहा तास रामराजे गायकवाड हे भर उन्हात उभे राहून वाहतूक सुरळीत करीत होते. दुपारी चार नंतर वाहतूक थोड्याफार प्रमाणात सुरळीत झाली तरी परंतु धीमे गतीनेवाहने मार्गक्रमण करीत होती. दुचाकी स्वार व छोट्या मोठ्या वाहतूक कोंडी असताना देखील आपल्या वाहनांना वाट काढण्याचा प्रयत्न केल्यामुळे वाहतूक कोंडी होण्यामध्ये मध्ये भरच पडली. काही वाहने बेलापूर मार्गे मार्गस्थ झाल्याने वाहतूक कोंडी सोडण्यास थोडी फार मदत झाली. भर उन्हात रामराजे गायकवाड यांनी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी केलेल्या कारणामुळे त्यांचे कौतुक होत आहे.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# मोर्चे निघाले आंदोलन केले, तरीही पाणीप्रश्न जैसे थे

## राहुरी खुर्दच्या नागरिकांची पाण्यासाठी भटकंती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी खुर्द परिसरातील तीव्र पाणीटंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असून नागरिकांचे हाल दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत. पाणी प्रश्नावर अनेक वेळा बातम्या प्रसारित झाल्या, महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयाला टाळे ठोकत मोर्चा देखील काढला, मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही किंवा सुधारणा झालेली दिसून येत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून गावातील अनेक भागांमध्ये एक ते दोन दिवस पाणीपुरवठा बंद राहत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. पाणीपुरवठा कधी होणार किंवा कधी बंद राहणार याबाबत कोणतीही पूर्वसूचना दिली जात




नसल्याने नागरिकांना ऐन उन्हाळ्यात पाण्यासाठी वनवन भटकंती करावी लागत आहे. महिलांना दूरवरून पाणी आणावे लागत असल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात शारीरिक व मानसिक दमछाक होत आहे.

पाणीटंचाईचा परिणाम आता नागरिकांच्या आरोग्य, व्यवसाय आणि कौटुंबिक जीवनावरही होत असल्याचे दिसून येत आहे. घरगुती वापरासाठी पाणी उपलब्ध नसल्याने कुटुंबांमध्ये वाद वाढत आहेत. पुरुषांनाही मोटरसायकलवर ड्रम घेऊन पाणी आणावे लागत असल्याने त्यांच्या रोजगारावर व कामधंद्यावर परिणाम होत आहे. अनेक व्यावसायिकांनाही पाण्याअभावी अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे गावातून मुळा नदी वाहते, परिसरात धरण आहे, ग्रामपंचायतीकडे स्वतःचे बोअरवेल आणि विहीर सुद्धा आहे. तसेच शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी आरओ प्लांटची उभारणी करण्यात आली आहे. मात्र, एवढ्या सुविधा उपलब्ध असतानाही नागरिकांना नियमित पाणी मिळत नसल्याने धरण उशाला आणि कोरड घशाला अशी परिस्थिती सत्यात उतरली आहे. आरओ प्लांटमध्येही पाणी उपलब्ध होत नसल्याने ग्रामस्थ संतप्त झाले असून पाण्याची व्यवस्था होत नसेल तर असे प्रकल्प उभारण्याचा उपयोग काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

ग्रामपंचायतीकडून कोणतीही प्रभावी पर्यायी व्यवस्था केली जात नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. दरम्यान, ग्रामपंचायतीने तात्काळ पाणीपुरवठा सुरळीत करावा, नियमित वेळापत्रक जाहीर करावे आणि पर्यायी उपाययोजना राबवून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. तसेच संबंधित प्रशासनानेही या गंभीर प्रश्नात लक्ष घालून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

---

## द • ख • ल

### प्रवरेच्या डॉ. बबन माने यांना वाणिज्य विषयात विद्यावाचस्पती पदवी प्रदान



**लोणी** : ज्ञानसाधना, अथक परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर दौंड येथील डॉ. बबन सुरेश माने यांनी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत वाणिज्य विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्राप्त केली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या वतीने त्यांना ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी प्रदान करण्यात आली. डॉ. माने यांनी पुणे महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या निवडक कल्याणकारी योजनांचा परिणाम अभ्यास या सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण विषयावर संशोधन करून आपला शोधप्रबंध सादर केला. यासाठी त्यांना लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.एम. दिघे उपप्राचार्य डॉ. आर. ए. पवार डॉ. व्ही. बी. बैरागी, डॉ. बी. डी. रणपिसे यांचे मार्गदर्शन लाभले.

### श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचा एसएससी परीक्षेचा निकाल ८९.१६ टक्के





**कोळपेवाडी** : रयत शिक्षण संस्थेच्या कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव-कोळपेवाडी येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाची एसएससी परीक्षेची परंपरा कायम राहिली असून विद्यालयाचा एकूण निकाल ८९.१६ टक्के लागला असल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रकाश चौरे यांनी दिली आहे. या परीक्षेमध्ये डोखे आर्यन दत्तात्रय याने ९५ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. जोर्वेकर कृष्णा संतोष याने ९३.६० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक, तर उगले श्रेयश संजय याने ९३.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. सर्व गुणवंत विद्यार्थिनींचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे माजी आमदार अशोकराव काळे, रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय अध्यक्ष आमदार आशुतोष काळे, स्थानिक स्कूल कमिटीच्या अध्यक्षा सौ. पुष्पाताई काळे, जिल्हा बँकेच्या माजी संचालिका सौ. चैतालीताई काळे, सल्लागार समितीचे अध्यक्ष व सदस्य, विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रकाश चौरे, उपमुख्याध्यापक देविदास माने, पर्यवेक्षक सचिदानंद झावरे व सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले आहे.

### श्री अगस्ति ऋषी आश्रमात अधिकमासानिमित्त कीर्तन महोत्सव



**अकोले** : तालुक्याचे श्रद्धास्थान असलेल्या श्री अगस्ति ऋषी आश्रमात पुरुषोत्तम (अधिक) मासानिमित्त १७ मे ते १६ जून दरम्यान अखंड महिनाभर कीर्तन महोत्सव व विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष के. डी. धुमाळ यांनी दिली. या महोत्सवात ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, एकनाथी भागवत व अगस्त्य महात्म्य ग्रंथांचे पारायण, रामायण कथा, प्रवचन, कीर्तन तसेच भजन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. समाजप्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर, माधव महाराज राठी, जयंत महाराज गोसावी यांच्यासह अनेक नामवंत कीर्तनकार व प्रवचनकार मार्गदर्शन करणार आहेत. उत्सवात २७ मे रोजी मोफत नेत्रतपासणी शिबिर, ३१ मे व १ जूनला शेतकरी मेळावा व दुग्ध व्यवसाय मार्गदर्शन, ७ जूनला आरोग्य तपासणी शिबिर, तर ७ ते ९ जूनदरम्यान भजन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. १६ जून रोजी महंत उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने महोत्सवाची सांगता होणार आहे.

---

# सार्वजनिक बोअर अडवल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव** : राहुरी तालुक्यातील म्हैसगाव आग्रेवाडी येथे आदिवासी कुटुंबाच्या वापरातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचा बोअर तसेच मुख्य रस्ता जाणीवपूर्वक अडविल्याप्रकरणी संबंधित व्यक्तीवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी तहसीलदार राहुरी यांच्याकडे करण्यात आली आहे. याबाबत अनिता संजय बर्डे यांनी तहसीलदारांना निवेदन देऊन न्यायाची मागणी केली आहे. त्यांनी दिलेल्या अर्जात म्हटले आहे की, यापूर्वीही संबंधित प्रकरणाबाबत तक्रार करण्यात आली होती. मात्र बराच कालावधी उलटूनही अद्याप मुख्य रस्ता खुला करण्यात आलेला नाही तसेच सार्वजनिक बोअरमधील पाणीपुरवठाही बंद करण्यात आला आहे. रस्ता आणि पाणी या मूलभूत गरजा असून त्या बंद झाल्यामुळे स्वतःसह कुटुंबाला मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे बर्डे यांनी निवेदनात नमूद केले आहे. संबंधित व्यक्तीविरुद्ध अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्याने प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच दोषी व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करून कुटुंबाला पोलीस संरक्षण देण्यात यावे व न्याय मिळवून द्यावा, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# सादतपूरमध्ये प्रवरेच्या कृषिदूतांचे उत्साहात स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषी शास्त्र संस्था, लोणी अंतर्गत कृषी व्यवसाय व्यवस्थापन पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचा ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत सादतपूर येथे गावप्रवेश उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांनी कृषिदूतांचे जल्लोषात स्वागत करत त्यांच्या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

गावचे सरपंच नारायण गुंजाळ यांच्या हस्ते कृषिदूत गटप्रमुख यश शेळके तसेच अभय मगर, हर्षल शेळके, रोहन कदम, विकास घोडके, रोहन खांदे, सिद्धेश पडोळ आणि तेजस मांडे यांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गावातील शेतकरी व ग्रामस्थांशी संवाद साधत आधुनिक शेती तंत्रज्ञान, कीड व रोग व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, शासनाच्या कृषी योजना तसेच कृषीपूरक व्यवसायांविषयी माहिती देण्याचा संकल्प व्यक्त केला. या उपक्रमासाठी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता विखे पाटील, कृषी शिक्षण संचालक डॉ. उत्तमराव कदम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष वर्पे, विभागप्रमुख प्रा. प्रदीप मखरे, कार्यक्रम समन्वयक प्रा. अश्विनी घाडगे आणि प्रा. सत्येन खर्डे यांचे मार्गदर्शन लाभत आहे. यावेळी उपसरपंच दिलीप मगर, ग्रामपंचायत सदस्य सागर कडलग, सोसायटी चेअरमन अजय शिंदे, तंटामुक्ती अध्यक्ष प्रकाश गोरे तसेच संजय मगर, रमेश मगर, बबनराव काळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमास सकारात्मक प्रतिसाद देत पूर्ण सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कृषिदूत विद्यार्थी गाव सर्वेक्षण, शेतभेटी, शेतकरी मार्गदर्शन, कृषी विस्तार उपक्रम तसेच विविध प्रात्यक्षिकांद्वारे शेतकऱ्यांना आधुनिक आणि शाश्वत शेतीविषयी मार्गदर्शन करणार आहेत. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाची माहिती मिळून शेती विकासाला चालना मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त होत आहे.

---

# मंगल कार्यालयांची जिल्हाधिकाऱ्यांनी पाहणी करावी : मनसेची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील मंगल कार्यालयांची जिल्हाधिकाऱ्यांनी अचानक पाहणी करून कागदपत्रांची तपासणी करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राहाता तालुका अध्यक्ष श्रीगणेश जाधव यांनी केली आहे. याबाबत त्यांनी अतिरिक्त जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर (शिर्डी) यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदन सादर केले. निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यातील अनेक मंगल कार्यालयांमध्ये विवाह समारंभासाठी अवाजवी दर आकारले जात असून अपेक्षित सुविधा दिल्या जात नाहीत.



अनेक ठिकाणी लाखो रुपये भाडे आकारूनही जीएसटीसह अधिकृत बिल दिले जात नसून साध्या कागदावर व्यवहार करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मंगल कार्यालय चालविताना जागेचे बिगरशेती रूपांतर, व्यावसायिक परवानग्या, सीसीटीव्ही व्यवस्था, छापील अनुक्रमांकित बिले, कर्मचाऱ्यांची नोंदवही, कार्यक्रम रजिस्टर तसेच विविध करांचे पालन करणे आवश्यक असतानाही अनेक ठिकाणी नियमांचे उल्लंघन होत असल्याचे जाधव यांनी निवेदनात नमूद केले आहे.

तसेच विवाह समारंभादरम्यान चोरी किंवा सोन्याचे दागिने लंपास झाल्यास संबंधित व्यवस्थापन जबाबदारी झटकत असल्याचा आरोपही करण्यात आला. सीसीटीव्ही यंत्रणा नसल्याने वधू-वर पक्ष अडचणीत येत असल्याचे त्यांनी सांगितले. अन्न व भेसळ प्रतिबंधक विभागाने वेळोवेळी तपासणी करून खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेची खातरजमा करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामीण व शहरी भागातील काही मंगल कार्यालयांची अचानक तपासणी केल्यास वास्तव समोर येईल, असा दावा जाधव यांनी केला.

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानासमोर मनसेच्या शैलीत कोणतीही पूर्वसूचना न देता आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही मनसेच्या वतीने देण्यात आला आहे.

---

# तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या रेल्वेगाड्यांना बेलापूर येथे थांबा देण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : दौंड-मनमाड रेल्वेमार्गावरील बेलापूर रेल्वे स्टेशनवर तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या सर्व रेल्वेगाड्यांना थांबा देण्यात यावा, अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे जिल्हा उत्तर विभाग सोशल मीडिया प्रमुख अभिषेक फुणगे यांनी विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेश वर्मा यांची भेट घेऊन केली. पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या विभागीय रेल्वे सल्लागार समितीच्या सभेनंतर अभिषेक फुणगे, ग्राहक पंचायतीचे तालुका संघटक संदीप अग्रवाल यांनी विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेश वर्मा यांची भेट घेत विविध अकरा मागण्यांचे निवेदन सादर केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार देशभर धार्मिक तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या रेल्वेगाड्या सुरू करण्याचे काम सुरू असून, दौंड-मनमाड मार्गावरील बेलापूर स्टेशनवर अशा रेल्वेगाड्यांना थांबा दिल्यास परिसरातील पाच तालुक्यांतील विशेषतः ग्रामीण भागातील प्रवाशांना मोठा लाभ



होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नुकतीच जाहीर झालेल्या पुणे-दानापूर साप्ताहिक अमृत भारत रेल्वेला बेलापूर येथे थांबा दिल्याबद्दल रेल्वे प्रशासनाचे आभार व्यक्त करण्यात आले.

तसेच पुणे-वाराणसी अमृत भारत रेल्वेलाही बेलापूर येथे थांबा देण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय पुणे-धुळे रेल्वे सुरू करणे, मनमाडहून सकाळी पुण्यात पोहोचणारी डेमू रेल्वे सुरू करणे, दौंड-मनमाड दुहेरीकरण पूर्ण झाल्यानंतर साईनगर-पंढरपूर रेल्वे पूर्ववत सुरू करणे, बेलापूर रेल्वे स्टेशनवरील अमृत भारत स्टेशनचे काम गतीने पूर्ण करणे, व्हीआयपी रूमची व्यवस्था करणे, आरपीएफ व जीआरपीमार्फत महिला सुरक्षा पोलिसांची नियुक्ती करणे तसेच रात्रीच्या वेळेस तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांची अतिरिक्त नियुक्ती करावी, अशा विविध मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या.

या चर्चेदरम्यान विभागीय रेल्वे सल्लागार समितीचे विश्वस्त रणजीत श्रीगोड, डॉ. गोरख बारहाते, राहुल मुथा, सुनील गुप्ता तसेच व्यापारी निलेश ओझा उपस्थित होते. विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेश वर्मा यांनी वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक अनिल पाठक यांच्याकडे निवेदन सादर करून सकारात्मक निर्णय घेण्याबाबत सूचना केल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान, पुणे-जबलपूर नियमित रेल्वे सुरू होणार असल्याने त्या रेल्वेलाही बेलापूर येथे थांबा देण्यात यावा, अशी मागणी ग्राहक पंचायतीचे तालुका अध्यक्ष डॉ. गोरख बारहाते यांनी केली.

# बेलापूर - रामगड जवळील रस्त्याच्या मधोमध खड्डा : त्वरित दुरुस्ती मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**बेलापूर** : श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर - रामगड येथे काँक्रिटच्या रस्त्याच्या मधोमध पाण्याच्या पाईपलाईनसाठीचा भला मोठा खड्डा पडलेल्या यातून पाणी निघत त्यामुळं तेथे रस्त्यावर पाणी साचले जात आहेत.अचानकपणे वाहतुकीसाठी अडचणी निर्माण होत असून या ठेकेदाराने सदर खड्डा भरुन घ्यावा,अशी मागणी होत आहेत.राहूरी - बेलापूरकडे जाणाऱ्या मुख्य ररत्याचे वर्षाअखेरीस काम पूर्ण झाले.बरेच दिवस तो खड्डा उघडाच ठेवण्यात आला असून बुजविण्यात आलेले नाही. रस्त्याच्या मधोमध भला मोठा खड्डा असल्याने वाहन चालविता ना अडचणी निर्माण होत आहे.रस्त्याच्या मधोमध हा खड्डा असल्याने वाहतुकीला अडथळे निर्माण होत आहेत.त्यामुळे हा खड्डा त्वरित भरुन घ्यावा, अशी मागणी होत आहे.

---

# सात्रळ महाविद्यालयाची रोजगारात मोठी झेप

## ४३ विद्यार्थ्यांना बहुराष्ट्रीय कंपन्या, बँकिंग क्षेत्रात नोकरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** : राहुरी तालुक्यातील सात्रळ येथील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने यंदा प्लेसमेंटमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले असून, तब्बल ४३ विद्यार्थ्यांना विविध नामांकित कंपन्या व बँकिंग क्षेत्रात नोकरीची संधी मिळाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी गुणवत्ता आणि मेहनतीच्या जोरावर बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये स्थान मिळविल्याने परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.




महाविद्यालयातील एम.एस्सी. विश्लेषणात्मक रसायनशास्त्र शाखेतील ३६ विद्यार्थ्यांची गुजरातमधील मॅक्लॉइड्स फार्मास्युटिकल्स, अहिल्यानगर येथील सन फार्मा, पुण्यातील इप्का लॅबोरेटरीज आणि लुपिन या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या औषधनिर्मिती कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. उर्वरित सात विद्यार्थ्यांना विविध बँका तसेच सात्रळ दूध डेअरीमध्ये रोजगाराची संधी मिळाली आहे. विशेष म्हणजे निवड झालेल्यांमध्ये १३ विद्यार्थिनींचा समावेश असून, ग्रामीण मुलींच्या यशाने कौतुकाचा वर्षाव होत आहे.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सोपान शिंगोटे यांनी ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासोबत रोजगारक्षम कौशल्ये मिळावीत, यासाठी संस्थेच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राशी जोडून त्यांना आत्मनिर्भर व स्वावलंबी बनविण्यावर भर दिला जात आहे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे यांनी स्थापन केलेल्या प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेने ग्रामीण शिक्षणाची भक्कम परंपरा निर्माण केली असून, लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी ती अधिक व्यापक केली.

सध्या संस्थेचे अध्यक्ष तथा राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कौशल्याधिष्ठित आणि विद्यार्थीहिताचे उपक्रम राबविले जात आहेत. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे, शालिनीताई विखे, अण्णासाहेब म्हस्के पाटील, डॉ. सुजय विखे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे, सचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक प्रा. डॉ. प्रदीप दिघे, महाविद्यालय विकास समिती, प्लेसमेंट अधिकारी व सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# मुलीच्या विवाहात सत्कार समारंभाला फाटा देत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील प्रगतशील शेतकरी अण्णासाहेब रामचंद्र वाघुले यांचे चि. सचिन व प्रगतशील शेतकरी प्रसाद (गणेश) पुंजाहरी मेहत्रे यांची सुकन्या चि. सौ. का. सुहानी या रुक्मिणी माधव कार्यालय येथे नुकत्याच पार पडलेल्या विवाह सोहळ्यामध्ये वधू पित्याने कार्यक्रमास होणाऱ्या सत्काराच्या खर्चाला फाटा देऊन आपल्या गावातील जिल्हा परिषद शाळेच्या खंडोबा वस्ती शाळेतील गरजवंत ,गरीब मुलांना वह्या पुस्तके शालेय साहित्यासाठी आर्थिक देणगी शाळेचे शिक्षक आहेर यांकडे सुपूर्द केली.



या उपक्रमाचे विवाह मधील उपस्थित सर्वांनी कौतुक केले. शिक्षणाचे महत्त्व असणाऱ्या या वधूपित्याने मदत केली जी रक्कम सत्काराच्या रूपाने खर्च होणार होती ती गरजवंत व गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य विकत घेण्यासाठी देण्यात आली आहे. सत्कारावर होणारा अनाठाई खर्च टाळून गरजवंत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्यासाठी मिळणारी ही रक्कम निश्चितच उपयोगात येऊन गरजवंत विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होण्यास मदत होणार आहे व अशा गरजवंत विद्यार्थ्यांचे आशीर्वाद निश्चित त्या कुटुंबास मिळतील.

त्यामुळे असा हार, शाल ,फेटे, यावर होणारा अनाठाई खर्च टाळून असा उपक्रम राबविणे निश्चित समाजाच्या हिताचे आहे. कारण शिक्षण हा समाजाच्या प्रगतीचा पाया आहे. त्यामुळे शाळा व शैक्षणिक क्षेत्रासाठी केलेली मदत मोलाची ठरते. वधू पित्याने केलेल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

द·ख·ल

## हिवरेबाजारला शेळीपालन प्रशिक्षण शिबिर



**नगर तालुका :** आदर्श गाव हिवरे बाजार येथील यशवंत कृषी ग्राम व पाणलोट क्षेत्र विकास संस्था व येवले ग्रो यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. १५ रोजी एक दिवसीय आधुनिक शेळीपालन प्रशिक्षण शिबीर पार पडले. पद्मश्री डॉ पोपटराव पवार व जि.प.चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ यांच्या हस्ते शिबिराचे उदघाटन संपन्न झाले. यावेळी बोलताना पोपटराव पवार यांनी पारंपरिक शेळी पालनाकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहिल्यास ग्रामीणअर्थकारणाला बळकटी येईल असे प्रतिपादन केले. तसेच शेळी पालन संदर्भात उपस्थितांकडून आलेल्या अडचणी शासन दरबारी पोहचवू अशी ग्वाही पोपटराव पवार यांनी दिली. गुंजाळ यांनी जिल्हास्तरावर शासकीय मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याची ग्वाही दिली. या शिबिरात हिवरे बाजार सह बीड, पाथर्डी, नेवासा श्रीगोंदा, पारनेर, शिरूर, आंबेगाव तालुक्यातील ३०० प्रशिक्षनार्थी सहभागी होते. शिबिराचे आयोजन व व्यवस्थापन यशवंत कृषी ग्राम व पाणलोट क्षेत्र विकास संस्थे तर्फे प्रसन्न पवार व येवले ग्रोचे विशाल येवले व अनंत रोहकले यांनी पाहिले.

## स्वराज्यात स्त्रिया सुरक्षित होत्या; आजची परिस्थिती विदारक - प्रा. महेंद्र मिसाळ

**लिंपणगाव :** छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती, श्रीगोंदा यांच्या वतीने यंदाची छत्रपती संभाजी महाराज जयंती विविध समाजोपयोगी उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. दोन दिवस चाललेल्या या उत्सवात मॅरेथॉन स्पर्धा, रक्तदान शिबीर, वक्तृत्व स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, शंभू शौर्यगाथा पुस्तक वाटप तसेच शंभूराजे शौर्य व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. १४ मे रोजी सायंकाळी सात वाजता आयोजित करण्यात आलेल्या विशेष व्याख्यानात प्रसिद्ध वक्ते व शंभू शौर्यगाथा पुस्तकाचे लेखक महेंद्र मिसाळ यांनी उपस्थितांना संबोधित केले. आपल्या प्रभावी आणि ओजस्वी भाषणातून त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा संघर्ष, पराक्रम, त्याग आणि बलिदान यांचे जिवंत चित्र उभे केले. शंभूराजांवर झालेल्या अमानुष छळाचे वर्णन करताना उपस्थित अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. इतिहासातील या प्रेरणादायी अध्यायासोबतच प्रा. मिसाळ यांनी सध्याच्या सामाजिक परिस्थितीवरही परखड भाष्य केले. जातीवाद, महिला सुरक्षा, युवकांमधील आत्महत्यांचे वाढते प्रमाण, भ्रष्टाचार तसेच मोबाईलच्या अतिरेकी वापरामुळे होणारे दुष्परिणाम याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. स्वराज्यात स्त्रिया सुरक्षित होत्या; मात्र आजच्या काळात लहान मुलीही सुरक्षित नाहीत, ही अत्यंत वेदनादायक बाब आहे, असे मत त्यांनी व्यक्त करत समाजाने छत्रपती संभाजी महाराजांच्या विचारांपासून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. व्याख्यानाला नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. जय शंभूराजे, जय शिवरायच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. टाळ्यांच्या कडकडाटात प्रा. मिसाळ यांच्या विचारांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## प्रा. भाऊसाहेब नरसाळे यांना पीएचडी



**पारनेर :** पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासासाठी 'हरित रसायनशास्त्र ही काळाची गरज बनली आहे. याच क्षेत्रात एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल टाकत पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील प्रा. भाऊसाहेब नरसाळे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखांतर्गत रसायनशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली आहे. भाऊसाहेब नरसाळे यांनी बहुघटक रूपांतरणामध्ये जैवपॉलिमर-आधारित उत्प्रेरकांचा उपयोग या विषयावर आपले संशोधन पूर्ण केले. नरसाळे यांना या संशोधनासाठी न्यू आर्टस् कॉमर्स अण्ड सायन्स महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रा. डॉ. दिलीप ठुबे व प्रा. डॉ. अनिल गाढवे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. नरसाळे यांच्या या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव अ‍ॅड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार अ‍ॅड. दीपलक्ष्मी म्हसे, विश्वस्त मा. आ. नंदकुमार झावरे पाटील, सीताराम खिलारी सर, डॉ भाऊसाहेब खिलारी, प्रा अर्जुन पोकळे सर, प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर, प्राचार्य डॉ भास्कर झावरे, प्राचार्य डॉ लक्ष्मण मतकर, उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, माजी उपप्राचार्य व संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ. दिलीप ठुबे यांच्यासह अनेकानी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## शहराच्या विकासाला वेग शिवतीर्थ चौक भूमिपूजन व वनउद्यान कामांची पाहणी



**सुपा :** सुपा शहराच्या शिवतीर्थ चौक सुशोभीकरण कामाचा शुभारंभ आणि सुरू असलेल्या वनउद्यान प्रकल्पाची पाहणी अशा विकासकामांच्या माध्यमातून सुपा शहराच्या सर्वांगीण विकासाचा निर्धार पुन्हा अधोरेखित करण्यात आला. अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते तसेच पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आ. काशिनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवतीर्थ चौक सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या कामामुळे सुपा शहराच्या सौंदर्यात भर पडणार असून चौक अधिक आकर्षक, सुबक व नागरिकांसाठी सुविधायुक्त होणार आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विकासकामे ही केवळ पायाभूत सुविधा नसून शहराच्या प्रगतीचे व ओळखीचे प्रतीक असल्याचे सांगितले. आ. दाते यांनी सुपा परिसरातील विकासकामांना प्राधान्य देत नागरिकांच्या अपेक्षांनुसार दर्जेदार कामे पूर्ण करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे नमूद केले. तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून मतदारसंघातील विकासाला अधिक गती मिळत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यानंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आ. दाते यांनी सुपा येथे सुरू असलेल्या वनउद्यान प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी करत कामाचा आढावा घेतला. संबंधित अधिकाऱ्यांकडून कामाची माहिती घेऊन प्रकल्प नियोजित वेळेत व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. सुपा परिसरातील नागरिकांसाठी पर्यावरणपूरक, निसर्गरम्य व विरंगुळ्याचे केंद्र ठरणाऱ्या या वनउद्यानामुळे शहराच्या सौंदर्यात आणखी भर पडणार असून नागरिकांना स्वच्छ व हिरवाईने नटलेले वातावरण उपलब्ध होणार आहे. पर्यावरण संवर्धनालाही विकासकामांइतकेच महत्त्व दिले जात असल्याचे आमदार काशिनाथ दाते यांनी यावेळी सांगितले.

# इंधन बचतीसाठी सरकारी कर्मचाऱ्यांचा दर शुक्रवारी 'नो व्हेईकल डे' !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** देशाचे यशस्वी नेतृत्व करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच देशाला संबोधित करताना इंधन बचत, ऊर्जा संवर्धन आणि पर्यावरण रक्षणासाठी महत्त्वपूर्ण संदेश दिला. 'Mission LiFE' अर्थात पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहन त्यांनी देशवासियांना केले आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देखील पर्यावरणपूरक उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी आग्रही असून, त्याच प्रेरणेतून अहिल्यानगर जिल्ह्यात शासकीय कर्मचाऱ्यांनी 'हरित चळवळी'चा महा-संकल्प केला आहे.'हरित शुक्रवार' उपक्रमातून इंधन बचतीचा संदेश उपक्रमांतर्गत प्रत्येक शुक्रवारी जिल्ह्यातील शासकीय कर्मचारी 'नो व्हेईकल डे' पाळणार आहेत.

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या सामाजिक वारशाला पुढे नेत उपाध्यक्ष अशोक अलका सूर्यभान मासाळ यांच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या मोहिमेस सरचिटणीस रावसाहेब निमसे, अध्यक्ष सुभाष तळेकर तसेच अहमदनगर डिस्ट्रिक्ट रेव्हेन्यू (महसूल) डिपार्टमेंट क्लास-३ गव्हर्नमेंट सर्व्हन्ट्स असोसिएशन आणि जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांच्या पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभत आहे.

कर्मचाऱ्यांनी स्वतःची खाजगी वाहने घरी ठेवून कार्यालयात येण्यासाठी सायकल, एसटी बस, रिक्षा किंवा सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. काही कर्मचारी २ ते ३ किलोमीटर अंतर पायी चालत कार्यालयात जाण्याचा संकल्पही करणार आहेत.



या उपक्रमातून इंधन बचतीबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजात पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

'एक कर्मचारी - एक वृक्ष' संकल्पनेतून हरित जिल्ह्याचा निर्धार

'अहिल्यानगर शासकीय कर्मचारी वन परिवार' या विशेष मोहिमेअंतर्गत प्रत्येक कर्मचारी एक झाड लावणार किंवा दत्तक घेणार आहे. कार्यालय परिसर, सार्वजनिक मोकळ्या जागा तसेच तालुकास्तरावर वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी संबंधित कर्मचाऱ्यावर राहणार आहे.

या माध्यमातून जिल्ह्यात 'शासकीय वन' ही नवी संकल्पना उभी करण्याचा प्रयत्न होणार असून, उत्कृष्ट वृक्ष संवर्धन करणाऱ्या कार्यालयांचा जिल्हास्तरावर सन्मान करण्यात येणार आहे.

प्लास्टिकमुक्त कार्यालयांसाठी कापडी पिशव्यांचे वाटप शासकीय कार्यालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांकडून प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळण्यासाठी संघटनेच्या वतीने मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

यामुळे पर्यावरण संवर्धनास हातभार लागणार असून, शासकीय कर्मचारी हा संवेदनशील लोकसेवक म्हणून समाजात सकारात्मक प्रतिमा निर्माण होण्यास मदत होणार आहे. आरोग्य रॅली, ट्रेकिंग आणि मानसिक स्वास्थ्यावर भर वाढत्या कामाच्या ताणतणावाच्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी महिन्यातून एकदा 'आरोग्य रॅली' किंवा 'ट्रेकिंग'चे आयोजन करण्यात येणार आहे.

याशिवाय सुदर्शन क्रिया, योग, प्राणायाम, ध्यानधारणा यांसारख्या उपक्रमांद्वारे कर्मचाऱ्यांचे मानसिक स्वास्थ्य आणि कार्यक्षमता वाढविण्यावर संघटनेचा भर राहणार आहे.

अशोक अलका सूर्यभान मासाळ यांनी सांगितले की, माननीय पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यांनी पर्यावरण रक्षणाचे जे स्वप्न पाहिले आहे, त्यात आपला वाटा उचलणे हे प्रत्येक सरकारी कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातून सुरू होत असलेली ही हरित चळवळ केवळ एक दिवसाचा उपक्रम नसून एक सामाजिक व्रत आहे. इंधन बचत, प्रदूषणमुक्ती आणि कर्मचाऱ्यांचे आरोग्य ही त्रिसूत्री घेऊन आम्ही मैदानात उतरलो आहोत. अहिल्यानगर पॅटर्न संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास आहे.

# जखणगावमध्ये सरपंचांसह ग्रामस्थांचे आमरण उपोषण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** आरोग्य ग्राम म्हणून राज्यातच नव्हे तर देशांमध्ये गाजत असलेल्या, नावीन्यपूर्ण आरोग्यदायी उपक्रम राबविणाऱ्या नगर तालुक्यातील जखणगाव मध्ये काही महत्त्वाचे प्रश्न पाठपुरावा करूनही मार्गी लागत नसल्याने सोमवार दि. १८ मे पासून जखणगाव येथील हटकेश्वर सभागृहात सर्व सदस्य व ग्रामस्थांसह सरपंच डॉ सुनिल गंधे आमरण उपोषण करणार आहेत. तसे निवेदन जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंता यांना दिले आहे.

वीज वितरण कंपनीमार्फत ग्रामीण भागात चालू केलेले संध्याकाळचे लोडशेडींग त्वरित बंद करणे, वाड्या वास्त्यावर सिंगल फेजिंग चे काम पूर्ण करणे, जल जीवन योजनेमार्फत अपूर्ण काम त्वरित पूर्ण करणे, बुऱ्हाननगर पाणी योजनेतुन होणारा पाणी पुरवठा नियमित चालू करणे, स्मशानभूमीसाठी शासनाने दिलेली जागा मोजून व अतिक्रमण मुक्त करून देणे, गावातील शिवरस्ते, शिवार रस्ते व अन्य रस्ते मोजून वाहतुकीसाठी खुले करणे इ. मागण्यांसाठी हे आंदोलन असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

जखणगाव मध्ये आरोग्यदायी गाव म्हणून अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम चालू आहेत. गावांमध्ये विविध विकास कामे ही मार्गी लागलेली आहे. परंतु या मूलभूत गोष्टी अद्याप अपूर्ण आहेत. त्यामुळे विकास




गावकऱ्यांसाठी मृगजळ ठरत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून गावांमध्ये हिंदूंसाठी स्मशानभूमी दहन भूमी स्वतंत्र नसल्याने अनेक नागरिकांचे हाल होतात. गेल्या वर्षी महसूल विभागाच्या सप्तपदी अभियान मध्ये ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महाराष्ट्र शासनाची ४६ गुंठे जागा स्मशानभूमीसाठी जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आली आहे. परंतु ती अद्याप मोजून निर्वेध करून ग्रामपंचायत ताब्यात प्रत्यक्ष देण्यात आलेली नाही. त्यामुळे या ठिकाणी कुठलेही काम झालेले नाही.महसूल विभाग व भूमि मापन यांच्यामार्फत पोलीस संरक्षणामध्ये ही जागा मोजून खोली करून देणे अपेक्षित आहे. जलजीवन योजनेअंतर्गत गावांमध्ये पाण्याची टाकी खंडोबा नगर येथे बांधण्यात आली असून त्या टाकीकडे जाणारी इनलेट पाईपलाईन अपूर्ण असल्याने पाणीपुरवठा होऊ शकत नाही. उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे जखणगावच्या दक्षिण भागामध्ये विहिरी कोरड्या झाल्या असल्याने त्या नागरिकांचे हाल होत आहेत. या टाकीत जाणारी पाईपलाईन पूर्ण झाल्यास जखणगावच्या वाड्यावस्त्यांना पाणीपुरवठा करणे शक्य होईल.परंतु तीन वर्षापासून चालू असलेले काम अद्याप अपूर्ण आहे.सुमारे साडेआठशे मीटर लांबीची पाईपलाईन त्वरित केल्यास योजना पूर्ण क्षमतेने कार्यरत करणे शक्य होईल. गावाला सुमारे ६ शिवरस्ते,८ वस्ती रस्ते, ४ इ जी मा तर ३प्र जी मा मा असून राष्ट्रीय महामार्ग गावातून जातो. यापैकी बरेच रस्त्यांवर अतिक्रमण असल्याने शेतकऱ्यांना वाहतूक करणे मुश्किल झाले आहे. अनेक वेळा अर्ज, ठराव, निवेदन देऊनही हे काम अद्याप झालेले नाही.

संबंधित शासकीय विभागाने ठोस उपाययोजना न केल्यास डॉ गंधे यांचेसह सर्व सदस्य व ग्रामस्थ त्याच सभागृहात आमरण उपोषणास बसणार आहेत.

हे पाचही मुद्दे मार्गी लागत नाही तोपर्यंत आपले आंदोलन चालूच राहील. नुसत्या आश्वासनावर आपण थांबणार नसून प्रत्यक्षात काम चालू झाल्याशिवाय आपण उपोषण सोडणार नाही असा स्पष्ट इशारा सरपंच डॉ सुनिल गंधे यांनी दिला आहे. प्रदीर्घ काळ आण्णासोबत आंदोलन करत असलेल्या व आपल्या कार्यकौशल्याने अल्पावधीतच ग्रामस्थांची मने जिंकलेल्या आदर्श सरपंच म्हणून अनेज पुरस्कार प्राप्त असलेल्या सर्वात उच्च शिक्षित सरपंच डॉ सुनिल गंधे यांनी पुकारलेले हे पहिलेच उपोषण आंदोलन किती यशस्वी होते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# जामखेडमध्ये ६ लाखांचा गुटखा साठा जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**जामखेड :** जामखेड शहरात खर्डा पोलिसांनी मध्यरात्री छापा टाकून तब्बल सहा लाख ३४ हजार १४६ रुपयांचा गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला. या प्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मालवाहू टेम्पोसह मुद्देमाल हस्तगत केला आहे. जामखेड - मोरेवस्ती रोडलगत प्रोफेसर कॉलनी परिसरात दि. १५ मे रोजी रात्री सुमारे १०.२५ वाजता ही कारवाई करण्यात आली. आरोपी बाळु ऊर्फ शिवदत्त नंदकुमार मोहिते (रा. बोराटे वस्ती, जामखेड) याच्या मालकीच्या महेंद्रा जितो मालवाहू बंद बॉडी टेम्पो (एमएच १२ एनएक्स २१८३) मधून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित पान मसाला व सुगंधी तंबाखू जप्त करण्यात आली.

या प्रकरणी जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खर्डा पोलीस स्टेशनचे पोलीस कॉ. बाळु खाडे यांनी फिर्याद दिली आहे.

कारवाईदरम्यान डायरेक्टर स्पेशल, विमल, सुपर साऊंड, सम्राट, एम. सिलेक्ट, एमएनडी तसेच प्रीमियम शॉट या विविध कंपन्यांचा पान मसाला व सुगंधी तंबाखूचा मोठा साठा जप्त करण्यात आला. जप्त तंबाखूजन्य मालाची किंमत दोन लाख ५९ हजार १४६ रुपये असून मालवाहू टेम्पोची किंमत ३ लाख ७५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली जामखेड पोलीस स्टेशनचे पो. नि. दशरथ चौधरी, खर्डा पो. स्टेशनचे सहा. पो. नि. उज्वलसिंह राजपूत, पो. कॉ. बाळु खाडे, वैजिनाथ मिसाळ, धनराज बिराजदार यांनी केली. आधिक तपास पो. उ.नि. गावडे करीत आहेत.

# काव्य सादरीकरणाने रसिक भारावले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** साहित्य, त्यातील कथा, कादंबरी,काव्य हे दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटनांचा समाज मनाचा आरसा असते. जे ऐकताना आपण त्यात हरऊन जातो त्यातील आनंद दुःख प्रेम विरह आपलेसे वाटते ते खऱ्या अर्थाने वाचकांच्या हृदयात स्थान निर्माण करून राहते असा आशावाद मुंबईच्या सुप्रसिद्ध कवयित्री अनघा तांबोळी यांनी व्यक्त केला. अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित वसंत व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या. याप्रसंगी वाचनालयाचे उपाध्यक्ष दिलीप पांढरे, डॉ. राजा ठाकूर, राहुल तांबोळी, प्रा. ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, किरण आगरवाल, अमोल इथापे, नितीन भारतात, पल्लवी कुक्कडवाल उपस्थित होते. दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घडामोडीवर भाष्य करताना प्रत्येकाला अंतर्मुख करणाऱ्या काव्यरचना अनघा तांबोळी यांनी सादर केल्या.

कॉमन मॅन' ही रचना सादर करताना सामान्य मध्यमवर्गीयांची रोजची जीवन जगण्याची धडपड व चाकोरीबद्ध मानसिकता यावर भाष्य केले. नव्या युगातील एकलव्य या विडंबन पर काव्यरचनेतून शिक्षण व्यवस्था त्याचे बाजारीकरण, स्पर्धा व त्यातून बाहेर पडणारी तरुण पिढी याबाबत चिंता व्यक्त करणारे विवेचन केले. प्रास्ताविक प्रा. ज्योती कुलकर्णी सत्कार शिल्पा रसाळ तर आभार राहुल तांबोळी यांनी मांडले.

# सरकारच्या कांदा खरेदीवर बहिष्कार टाकावा : घनवट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** केंद्र सरकारने जाहीर केलेल्या कांदा खरेदी धोरणावर स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी जोरदार टीका करत शेतकऱ्यांना थेट आवाहन केले आहे की, नाफेड आणि एनसीसीएफला कांदा विकू नका; सरकारी खरेदीवर बहिष्कार टाका.

सरकारने देशभरात दोन लाख टन कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेतला असून महाराष्ट्रात १२३५ रुपये प्रति क्विंटल दराने कांदा खरेदी केली जाणार आहे. सरकार याला शेतकरीहिताचा निर्णय म्हणत असले, तरी हा निर्णय प्रत्यक्षात कांद्याचे वाढणारे बाजारभाव पाडण्यासाठीचा 'बफर स्टॉक' असल्याचा आरोप घनवट यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे. घनवट म्हणाले, एका क्विंटल कांद्याच्या उत्पादनासाठी शेतकऱ्यांना किमान दोन हजार रुपये खर्च येतो, तर साठवणुकीसाठी अतिरिक्त खर्च आहे. अशावेळी १२३५ रुपयांचा दर म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे.त्यांच्या मते, पुढील काही महिन्यांत कांद्याचे दर वाढण्याची शक्यता असल्याने सरकार सध्या कमी दरात कांदा खरेदी करून नंतर बाजारात तोच कांदा विकून दर नियंत्रित करण्याचा प्रयत्न करणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना मिळणारा वाढीव नफा हिरावला जाणार आहे.नाफेड आणि एनसीसीएफमार्फत होणाऱ्या खरेदी प्रक्रियेवरही त्यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले. यापूर्वी अशा खरेदीत कागदोपत्री व्यवहार, निकृष्ट दर्जाच्या कांद्याची अदलाबदल आणि भ्रष्टाचाराचे प्रकार झाल्याचा आरोप करत, या प्रक्रियेत काही अधिकारी, व्यापारी आणि दलालांचेच भले होते; शेतकरी आणि ग्राहक दोघेही फसतात, असे त्यांनी म्हटले.स्वतंत्र भारत पक्ष तर्फे मुख्यमंत्री यांना निवेदन पाठवून कांदा खरेदीचा निर्णय तातडीने रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, वाढत्या तापमानामुळे साठवलेल्या कांद्याचे नुकसान होण्याची भीती असली, तरी भविष्यात चांगला दर मिळण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी संयम ठेवावा आणि सरकारी खरेदीवर सामूहिक बहिष्कार टाकावा, असे आवाहनही घनवट यांनी केले आहे.

# भारतीय डाक विभागाच्या आधार शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## ग्रामीण भागातील नागरिकांसाठी शिबिरांची गरज : रामदास फुले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील नेप्ती येथील ग्रामपंचायत कार्यालयात भारतीय डाक विभागाच्या वतीने अहिल्यानगर आर. एस. केडगाव पोस्ट ऑफिसमार्फत आयोजित करण्यात आलेल्या विशेष आधार नोंदणी व अद्ययावत सेवा शिबिर उत्साहात आणि यशस्वीरीत्या संपन्न झाले. प्रवर अधीक्षक डाकघर, अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दिवसभर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध आधार सेवांचा लाभ घेतला अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

शिबिरामध्ये लहान बालकांची नवीन आधार नोंदणी, पाच वर्षे पूर्ण झालेल्या बालकांचे बायोमेट्रिक अद्ययावतीकरण, आधार कार्डशी मोबाईल क्रमांक संलग्न करणे तसेच नाव, पत्ता, जन्मतारीख, छायाचित्र आणि इतर तपशीलांमध्ये दुरुस्ती व अद्ययावत करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. नागरिकांच्या आधार संदर्भातील तक्रारी आणि अडचणींचे तत्काळ निराकरण करण्यात आल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. नेप्ती ग्रामस्थ व ग्रामपंचायतच्या सहकार्यामुळे हे शिबिर पार पडले.

ज्येष्ठ नागरिक शिबिरादरम्यान महिला, विद्यार्थी आणि पालकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. अनेक नागरिकांनी आधारमधील त्रुटी दूर करून घेतल्या, तर काहींनी मोबाईल क्रमांक अद्ययावत करून घेत विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक प्रक्रिया



पूर्ण केली. दिवसभर डाक विभागाच्या कर्मचाऱ्यांनी नागरिकांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास मदनलाल मीना, सब पोस्ट मास्टर आर एस केडगाव अमित कोरडे, शिवम पवार, रामदास फुले, मा. उपसरपंच जालिंदर शिंदे, सुरेश कदम, ज्ञानेश्वर गडाख, भानुदास फुले, शंकर फुले, हिराबाई राऊत, पायल साळवे, मंदा साळवे ,शिवांश जपकर, श्रावण जपकर, हर्षद बेल्हेकर, विजय साळवे, संदेश साळवे, करिष्मा साळवे, प्रथमेश वैराळ, शितल वैराळ, पियुष वैराळ, सर्वज्ञ चौरे, पप्पू वैराळ, आरा सय्यद ,गुलाब सय्यद, महबूब सय्यद, मोहन कदम, रुबीना सय्यद, बिस्मिल्ला सय्यद, नितीन साळवे, उज्वला साळवे, वैशाली चौगुले, साधना पवार, गायत्री धोत्रे,रबिया सय्यद, व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना आधार कार्डमधील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी किंवा अद्ययावत करण्यासाठी शहरात जावे लागते. त्यामुळे त्यांचा वेळ आणि आर्थिक खर्च वाढतो. भारतीय डाक विभागाने नेप्ती येथे आयोजित केलेले हे विशेष शिबिर नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले असून अशा उपक्रमांमुळे सामान्य माणसाला मोठा दिलासा मिळत आहे. आज आधार कार्ड हे प्रत्येक नागरिकासाठी अत्यावश्यक दस्तऐवज बनले आहे. शासकीय योजना, शैक्षणिक प्रक्रिया, बँकिंग व्यवहार यांसाठी आधारची आवश्यकता भासत असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या गावातच या सुविधा उपलब्ध होणे ही काळाची गरज आहे. ग्रामपंचायत, डाक विभाग आणि स्थानिक नागरिक यांच्या सहकार्यामुळे हे शिबिर यशस्वी झाले असून भविष्यातही अशा लोकहिताच्या उपक्रमांना समाजातून मोठा प्रतिसाद मिळेल, असा विश्वासही रामदास फुले यांनी व्यक्त केला.

द•ख•ल

## मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाबाबत १९ मे रोजी बैठक

**पुणे :** भारत निवडणूक आयोग यांनी महाराष्ट्रासह १९ राज्ये आणि ३ प्रदेशांमध्ये मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण (डखठ) कार्यक्रम जाहीर केला आहे. महाराष्ट्रात हा कार्यक्रम दि. २० जून २०२६ पासून सुरू होणार असून त्याबाबतचे संपूर्ण वेळापत्रक आयोगाच्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर करण्यात आले आहे .या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील सर्व मतदारसंघांमध्ये करावयाच्या तयारीचा आढावा, विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाची माहिती तसेच मतदारांमध्ये जनजागृती व्यापक प्रसिद्धी याबाबत चर्चा करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली दि. १९ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथील बहुउद्देशीय सभागृह, ५ वा मजला येथे होणार आहे. संबंधित सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहावे, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी

## सुरेश वडगावकर ज्ञानदीप शिष्यवृत्ती सोहळ्यात १३८ विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ

**आळंदी :** श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज यांच्या वतीने संस्थेचे सचिव अजित वडगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सुरेश वडगावकर ज्ञानदीप शिष्यवृत्ती वितरण सोहळा वातावरणात पार पडला. यावेळी बालवाडी ते बारावीपर्यंतच्या गरीब, गरजू व होतकरू अशा १३८ विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक हजार रुपयांची शिष्यवृत्ती मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. विविध दात्यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमात शिक्षण आयुक्त कार्यालयाचे उपसंचालक काळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, शिष्यवृत्ती ही केवळ आर्थिक मदत नसून विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचा आणि कुटुंबाचा विकास साधावा, असे आवाहन केले. तसेच पालकांनी मुलांवर चांगले संस्कार घडविण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. कृषी उत्पन्न बाजार समिती खेडचे सभापती विजयसिंह शिंदे यांनी शिक्षण क्षेत्रातील बदलत्या धोरणांवर भाष्य करत श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुरेश डॉ.दीपक पाटील, अजित वडगावकर, प्राचार्य किसन राठोड, मुख्याध्यापक प्रदीप काळे, अशोक उमरगेकर, नंदकुमार वडगावकर, मनोहर दिवाणे, बाबूलाल घुंडरे, संगिता पाटील यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन योगेश मठपती यांनी केले.



## नव भारत साक्षरता कार्यक्रमासाठी उसनवारी तत्वावरील पदभरती अर्जास मुदतवाढ

**पुणे :** शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यावतीने केंद्र पुरस्कृत नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून विविध पदांसाठी उसनवारी तत्वावर शिक्षक व अधिकारी संवर्गातील पात्र कर्मचाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात आले होते. मात्र अपेक्षित प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्याने अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. हा कार्यक्रम राज्यातील १५ वर्षे व त्यापुढील वयोगटातील नागरिकांसाठी राबविण्यात येत असून स्थानिक स्वराज्य संस्था तसेच शासकीय सेवेत कार्यरत शिक्षक, उपशिक्षणाधिकारी किंवा तत्सम गट-ब पदावरील अधिकारी, सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक, विस्तार अधिकारी (शिक्षण) तसेच तत्सम पदांवरील इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. आवेदनपत्र सादर करण्यासाठी गुगल लिंक शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून अर्ज भरण्याचा कालावधी १५ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून ते २२ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत राहणार आहे. प्राप्त अर्जांच्या संख्येनुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता, अनुभव, मुलाखत, सादरीकरण आदी निकषांच्या आधारे नियुक्ती प्रक्रिया संचालनालय स्तरावर येणार असल्याचे शिक्षण संचालनालयाने कळविले आहे.

## भारतीय सशस्त्र सैन्यदलात अधिकारी पदासाठी मोफत पूर्व प्रशिक्षण सुविधा

**पुणे :** भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे संयुक्त संरक्षण सेवा (सीडीएस) परीक्षा पूर्वतयारीसाठी सीडीएस कोर्स क्रमांक ६७ आयोजित आला आहे. हा प्रशिक्षण वर्ग १५ जून ते २८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत होणार आहे. या प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांनी १४ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रात उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, पुणे यांनी केले आहे. प्रवेशासाठी उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक असून केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (यूपीएससी) घेण्यात येणाऱ्या सीडीएस परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज केलेला असावा. इच्छुक उमेदवारांनी सैनिक कल्याण विभाग, पुणे यांच्या संकेतस्थळावरून सीडीएस-६७ कोर्सचे प्रवेशपत्र व संबंधित परिशिष्टांच्या दोन प्रती डाउनलोड करून पूर्ण भरून मुलाखतीस उपस्थित राहावे. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींना मोफत प्रशिक्षणासोबत निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# शाश्वत विकासाची उद्दिष्टे डोळ्यासमोर केंद्राचे बळकटीकरण करा: उपमुख्यमंत्री

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे नामकरण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे बळकटीकरण करतांना शाश्वत विकासाची उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून बळकटीकरण करावे, गाईंचा प्रचार व प्रसार होण्याच्यादृष्टीने पुशपालकांना प्रशिक्षणाच्या माध्यमातून देशी गाईंचा मोठ्या प्रमाणात जतन व संवर्धन करण्याचे काम करावे, राज्यातील शेतकरी, पशुपालक आणि विद्यार्थ्यांसाठी हे केंद्र प्रेरणादायी ठरणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केल्या.

यावेळी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार, महात्मा फुले विद्यापीठ कुलगुरू डॉ. विलास खर्चे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक राहुल महिवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, प्राचार्य डॉ सुभाष भालेकर, सोमनाथ माने आदी उपस्थित होते.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी महाविद्यालय, पुणे येथील पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, येथे कार्यरत असलेल्या देशी गाय व प्रशिक्षण केंद्राचे अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र'' असे नामकरण करण्यास राज्य शासनाने मान्यता देण्यात दिली होती ; त्यानुसार आज राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते नामकरण फलकाचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी केंद्रांच्या नुतन इमारतीच्या विकास कामाची पाहणी केली, यावेळी त्या होत्या.

श्रीमती पवार म्हणाल्या, देशी गायीचे शास्त्रीयदृष्ट्या संवर्धन, सुधारणा व संशोधन करणे आवश्यक असल्याने कृषी महाविद्यालय, पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे बळकटीकरणाचे काम दर्जेदार पद्धतीने व कालमर्यादेत पूर्ण करावे. कामे करतांना बदलत्या काळानुसार अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा , तसेच या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, देखभाल व दुरुस्तीच्या साहित्य उपलब्धतेचा विचार करण्यात यावा. पर्यावरण संवर्धनाच्यादृष्टीने सोलरच्या माध्यमातून वीजनिर्मिती करण्यासाठी सोलर पॅनल बसवावेत.





केंद्रातील गाईंची संख्या विचारात घेता मलमुत्र व शेणाचे व्यवस्थापन करुन केंद्रामध्ये स्वच्छता ठेवावी. गाईंना पुरेसा प्रमाणात चारा, पाणी उपलब्ध राहील, याबाबत दक्षता घ्यावी. केंद्रांमार्फत दुधांपासून दुग्धजन्य उपपदार्थ निर्मितीवर भर देण्यात यावा, प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगार निर्मितीवर देण्यात यावा, असेही श्रीमती पवार म्हणाल्या.

श्रीमती पवार म्हणाल्या, ग्रामीण विकास, शेती आणि पशुसंवर्धन क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. त्यांच्या नावाने उभारण्यात आलेले हे केंद्र संशोधन, प्रशिक्षण आणि नवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांना नवी दिशा देणारे ठरेल. देशी गायींचे संवर्धन, उत्पादनवाढ आणि शाश्वत पशुपालन हे केंद्र महत्त्वपूर्ण कार्य करेल, असा विश्वास व्यक्त करुन महिला शेतकरी प्रशिक्षण देखील या केंद्रात सुरू करण्याची सूचना केली. शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी केंद्रामार्फत करण्यात येणाऱ्या कामकाजाबाबत माहिती दिली. इंधन तुटवड्याच्या काळात या केंद्राला विविध शेतकऱ्यांनी भेटी देवून येथील बायोगॅस प्रकल्पानुसार शेतकरी छोटे-छोटे प्रकल्प उभारत आहेत. शेतकरी, विद्यार्थी संशोधकांसाठी अत्याधुनिक प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देत देशी गायींच्या संवर्धनासाठी विविध प्रकल्प राबविण्यात येत असल्याचे डॉ. माने म्हणाले.

राज्य शासनाच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेले हे केंद्र ग्रामीण भागातील पशुपालकांसाठी मार्गदर्शक ठरत असून आधुनिक पशुपालन तंत्रज्ञानाचा प्रसार, उत्पादनक्षमता वाढ आणि शाश्वत शेती व्यवस्थेला चालना देण्याचे कार्य करणार आहे. या केंद्रामुळे अनुभवाधारित शिक्षणाची संधी उपलब्ध होणार असून संशोधन आणि विस्तार कार्याला नवे बळ मिळणार असल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

कार्यक्रमास प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी, पशुपालक आणि शेतकरी उपस्थित होते.

# समोरच्या वाहनाने दिली हुलकावणी

## चारचाकी पुलावरून कोसळली ; तिघेजण जखमी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** मंचर – पारगाव मार्गावर अवसरी खुर्द गावच्या हद्दीत स्मशानभूमीजवळ शनिवारी सकाळी भीषण अपघाताची घटना घडली. समोरून जाणाऱ्या वाहनाने अचानक हुलकावणी चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि आयटेल कंपनीची चारचाकी गाडी थेट पुलावरून खाली कोसळली. या अपघातात एक महिला व दोन तरुण जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ही घटना शनिवार दिनांक १६ मे रोजी सकाळी ११:३० वाजण्याच्या दरम्यान घडली. अपघातात साहिल गंगाधर पानसरे (वय १९), अर्चना गंगाधर पानसरे ४०) आणि दीपक भागुजी पानसरे (वय २१, सर्व रा. पारगाव गंगेवाडी, ता. आंबेगाव) हे तिघेजण जखमी झाले आहेत. जखमी तिघेही एकाच कुटुंबातील असल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पानसरे कुटुंब मढी येथे देवदर्शनासाठी गेले होते. दर्शन करून आपल्या गावाकडे परतत असताना अवसरी खुर्द गावाजवळील पुलावर समोरच्या वाहनाने अचानक मारल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर



चारचाकी वाहन झाडाला धडकत खाली कोसळले. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढले. त्यानंतर त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुदैवाने या अपघातात जीवितहानी टळली असली तरी वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ नागरिकांची झाली होती.

# जिल्ह्यात घरसुचीकरण व गृहगणनेला आजपासून सुरुवात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** भारताच्या १६ व्या जनगणनेच्या अनुषंगाने जिल्ह्यात घरसुचीकरण व गृहगणनेच्या प्रकियेला सुरुवात झाली असून जिल्ह्यातील नागरिकांनी या कार्यात सक्रियपणे सहभाग घेवून सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे. नगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्याला जिल्ह्यात १ मे २०२६ पासून सुरुवात करण्यात आली असून १५ मे २०२६ १ लाख ५३ हजार नागरिकांनी स्व-गणना केली आहे. जनगणनेच्या अनुषंगाने माहिती गोळा करण्यासाठी आजपासून प्रगणक १४ जून २०२६ पर्यंत प्रत्येक घराला भेट देणार आहे. यावेळी प्रगणकांद्वारे गृहगणना करण्यात येणार असून नागरिकांनी आपल्याशी निगडित अचूक माहिती त्यांना द्यावी. आपल्या परिसरातील नागरिकांनाही अद्ययावत माहिती देण्यास प्रोत्साहित करावे. घरगणनेच्या अनुषंगाने पुणे व चिंचवड महानगर पालिकेसह जिल्ह्यात प्रगणक आणि पर्यवेक्षकांसह सुमारे

### नागरिकांनी घर सुचीकरण व गृहगणनेच्या कार्यात सहकार्य करावे-जिल्हाधिकारी जितेंद्र

३० हजार क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. या कामासाठी, भारताचे महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांच्या कार्यालयाने आखून दिलेली संरचित पाच-स्तरीय प्रशिक्षण प्रणाली लागू करण्यात आली आहे, अशी माहिती श्री. डुडी यांनी दिली आहे. जनगणना कायदा १९४८ च्या तरतुदींनुसार राबवला जाणारा अत्यंत राष्ट्रीय उपक्रम आहे. प्रभावी धोरण निर्मितीला पूरक ठरणारा आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात योगदान देणारा विश्वसनीय माहितीचा संग्रह (डेटा) निर्माण करण्यासाठी सक्रिय लोकसहभाग आवश्यक आहे, नागरिकांनी आपल्या घरी येणाऱ्या प्रगणकाला संपूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन श्री. डुडी यांनी केले आहे.



# वयोवृद्ध आजोबांच्या घरफोडीचा छडा

## ओतूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई, आरोपी अटकेत ;१०० टक्के मुद्देमाल हस्तगत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** नेतवड (कुटेमळा) येथील ९५ वर्षीय वृद्धाच्या घरात झालेल्या घरफोडीचा अवघ्या काही दिवसांत छडा लावत ओतूर पोलिसांनी आरोपीला अटक करून चोरीस गेलेले तब्बल लाख २० हजार रुपये किमतीचे सात तोळे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात यश मिळविले आहे. या कारवाईमुळे परिसरात पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, मौजे नेतवड, कुटेमळा (ता. जुन्नर) येथील बजाबा महादू कुटे (वय ९५) यांनी त्यांच्या पत्नीचे सोन्याचे दागिने घरातील पोटमाळ्यावर



सुरक्षित ठेवले होते. दरम्यान, १ मे ते ७ मे २०२६ या कालावधीत अज्ञात चोरट्याने घरातील पेटीचा कडी-कोयंडा तोडून त्यातील सोन्याचे दागिने लंपास केले. चोरीस गेलेल्या ऐवजात तीन तोळ्यांचे मनीमंगळसूत्र, अडीच तोळ्यांचे सहा सोन्याचे पान व एक पुतळा, अर्धा तोळ्याची सोन्याची नथ तसेच एक तोळ्याच्या दोन सोन्याच्या पेट्या असा एकूण सात तोळे वजनाचा व लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल होता.

याप्रकरणी तान्हाजी बजाबा कुटे (वय ५६, रा. नेतवड कुटेमळा) यांनी ओतूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर गु.र.नं. १३०/२०२६ भा.न्या.सं. कलम ३३१(३), ३०५ अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासाची सूत्रे पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव यांच्याकडे देण्यात आली होती. ओतूर पोलिसांनी तांत्रिक गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवत आरोपी अभिषेक खंडू कुटे (वय ३२, सध्या रा. टिटवाळा, जि. ठाणे, मूळ रा. नेतवड कुटेमळा) यास ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून चोरीस गेलेले सर्व सोन्याचे दागिने जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

# उष्णतेच्या झळांनी दिवे परिसरातील शेतीकामे मंदावली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**दिवे :** मे महिना अर्धा आला तरी दिवे परिसरात अद्याप मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावलेली नाही. वाढत्या तापमानामुळे नागरिकांसह शेतकरीही हैराण झाले असून उष्णतेची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. कडक उन्हामुळे अंगाची अक्षरशः लाही-लाही होत असल्याने शेतमजूर मिळणे कठीण झाले आहे. परिणामी अनेक ठिकाणी शेतीकामांचा वेग मंदावला असून काही कामे ठप्प झाली आहेत. दिवे परिसर हा उत्पादनासाठी ओळखला जातो. पुरंदर उपसा जलसिंचन योजनेमुळे येथे सध्या फ्लॉवर, कोबी, काकडी आदी पिकांची लागवड करण्यात आली आहे. मात्र वाढत्या उष्णतेमुळे पिकांची वाढ खुंटण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीतही शेतकरी इर्जिक पद्धतीने शेतीकामे सुरू ठेवत आहेत. विशेषतः फ्लॉवर, कोबी आणि काकडी पिकांमध्ये खुरपणीची कामे सध्या आहेत. सकाळच्या तुलनेने थंड वातावरणात काही प्रमाणात मजूर कामासाठी पलब्ध होत असले तरी दुपारच्या कडक उन्हात काम करणे अशक्य बनत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडत आहे. मजुरीचे दर वाढले असतानाही अनेक मजूर कामावर येण्यास टाळाटाळ करत असल्याने शेतकऱ्यांना स्वतःच शेतात उतरून कामे करावी लागत आहेत. त्यामुळे इर्जिक खुरपणीची कामे सुरू ठेवली जात आहेत.न्सूनपूर्व पावसाच्या एक-दोन जोरदार सरी झाल्यास उष्णतेपासून दिलासा मिळण्याबरोबरच पिकांनाही मोठा फायदा होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. मात्र आकाशात ढगांची चाहूल असूनही पाऊस पडत नसल्याने चिंता वाढली आहे. आगामी काही दिवसांत पाऊस न झाल्यास भाजीपाला पिकांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त जात आहे. फोटो ओळ : दिवे (ता. पुरंदर) येथे काकडी पिकात खुरपणी करताना शेतकरी.



# एआय तंत्रज्ञानातून शेतीत नवी क्रांती; गोविंदबागेत ऊस-केळी पिकांची पाहणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती येथील गोविंदबाग शारदानगर येथे आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकसित करण्यात आलेल्या ऊस व केळी पिकांची पाहणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली. यावेळी एआय तंत्रज्ञानामुळे शेती क्षेत्रात होत असलेल्या सकारात्मक बदलांची माहिती कृषी विज्ञान विषय विशेषज्ञ व एआय तज्ज्ञ डॉ. विवेक भोईटे यांनी उपस्थितांना दिली. एआय तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ऊसाची जाडी वाढणे, कांड्याचा पेरा अधिक लांब होणे, फुटव्यांवर नियंत्रण राहणे तसेच उत्पादन खर्च कमी करून अधिक गुणवत्तापूर्ण उत्पादन घेणे शक्य होत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. जमिनीची सुपीकता टिकवून ठेवत शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन आणण्याच्या उद्देशाने शरद पवार सातत्याने आधुनिक शेती तंत्रज्ञानासाठी प्रयत्नशील असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. देशाचे माजी केंद्रीय कृषिमंत्री म्हणून कार्य करताना शरद पवार यांनी देशात फलोत्पादन क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली. १९८९ मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून शंभर टक्के फळबाग योजना राबवून राज्यातील गरीब शेतकऱ्यांच्या शेतात फळपिक लागवडीस दिली. त्यानंतर केंद्रीय कृषिमंत्री पदाची धुरा



सांभाळताना राष्ट्रीय फलोत्पादन अभियान (NHM) आणि राष्ट्रीय बागायती मंडळ (NHB) योजनांद्वारे देशभर फळबाग शेती वाढीसाठी महत्त्वपूर्ण धोरणे राबविण्यात आली. परिणामी महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांतून फळपिकांची निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढून देशाला परकीय चलन मिळण्यास मदत झाली.

# रुई गावात स्वच्छतेचा जागर; दहावा शनिवारही संपदा चौधर यांच्या पुढाकारातून परिसर स्वच्छतेवर भर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पाहिलेले स्वच्छ, सुंदर आणि आदर्श बारामतीचे स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने रुई (ता. बारामती) येथे स्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आले. गेल्या अनेक आठवड्यांपासून सातत्याने सुरू असलेल्या या उपक्रमाचा (दि:१६) रोजी सलग दहावा पार पडला. दर शनिवारी अथवा रविवारी नियमितपणे हे अभियान राबविले जात असून, परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत जनजागृती केली जात आहे.

बारामती नगर परिषदेच्या नगरसेविका तथा



उपगटनेते संपदा चौधर यांच्या माध्यमातून या अभियानाचे आयोजन करण्यात आले. गावातील मुख्य रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, चौक, गटारे तसेच नागरिकांच्या वर्दळीच्या परिसरात स्वच्छता करण्यात आली. यावेळी संकलन, साफसफाई तसेच स्वच्छतेबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

या अभियानात स्थानिक नागरिक, युवक, महिला तसेच कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्वच्छ गाव – सुंदर गाव हा संदेश देत नागरिकांनी परिसर स्वच्छ ठेवण्याची सामूहिक जबाबदारी पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने त्यामध्ये सक्रिय सहभाग पाहिजे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

गेल्या दहा आठवड्यांपासून कोणताही खंड न पडता हे अभियान सातत्याने राबविले जात असल्याने परिसरातील नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. रुई गाव परिसर अधिक स्वच्छ, निरोगी आणि सुंदर करण्यासाठी भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

> रस्त्यावर उघड्यावर कुठेही कचरा टाकू नये. प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसराची स्वच्छता राखणे ही सामूहिक जबाबदारी समजून सहकार्य करावे. स्वच्छ आणि सुंदर बारामती घडविण्यासाठी नागरिकांनी स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन बारामती नगर परिषदेच्या नगरसेविका तथा उपगटनेते संपदा चौधर यांनी केले.गेल्या दहा आठवड्यांपासून कोणताही खंड न पडता हे अभियान सातत्याने जात आहे.
>
> **संपदा चौधर**
> **(नगरसेविका तथा उपगटनेते बारामती नगर परिषद)**

# मंदिर चोरीप्रकरणी तिघे जेरबंद

## ३.३० लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** बेल्हे (ता. जुन्नर) येथील मुक्ताई माता मंदिरातून साऊंड सिस्टम व चोरी करणाऱ्या परजिल्ह्यातील टोळीला आळेफाटा पोलिसांनी अटक केली असून, तिघांकडून ३ लाख ३० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

संतवाडी (ता. जुन्नर) येथील फिर्यादी विजय शरद फापाळे यांच्या मालकीचा टाटा कंपनीचा ७०९ टेंपो तसेच दोन एम्प्लिफायर मशीन १८ एप्रिल रोजी रात्री चोरीला गेले होते. याप्रकरणी आळेफाटा पोलीस गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांच्या सूचनेनुसार आळेफाटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांच्या पथकाने तपास





सुरू केला. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे युवराज पोपट कातोरे (वय २८), निवृत्ती भाऊसाहेब मेंगाळ (वय २०) आणि अजय किसन मेंगाळ (वय २५, सर्व जाबूत बु., ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) यांना ताब्यात घेण्यात आले.

पोलीस चौकशीत आरोपींनी बेल्हे येथील मुक्ताई माता मंदिरातून चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींकडून एम्प्लिफायर मशीन, मिक्सर, एलईडी टीव्ही, देवीचे मंगळसूत्र तसेच अन्य साहित्य असा एकूण ३ लाख ३० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.ही कारवाई पुणे अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आळेफाटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विश्वास जाधव, पोलीस उपनिरीक्षक सतीश टाकरे, पोलीस कर्मचारी राजेंद्र हिले, भिमा लोंढे, विनोद गायकवाड, पंकज पारखे, अमित माळुंजे, नविन अरगडे, ओंकार खुणे, गणेश जगताप, प्रशांत तांडगकर आणि सखाराम झुंबड यांच्या पथकाने

द·ख·ल

## २५ मे रोजी कुकडीचे आवर्तन सुटणार शेतकऱ्यांना मोठा दिलासा आ. पाचपुते

**श्रीगोंदा :** 'एल निनो'च्या प्रभावामुळे राज्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असताना, अनेक ठिकाणी पाणी आरक्षित ठेवण्याची वेळ आली आहे. अशा कठीण परिस्थितीतही श्रीगोंदा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या आदेशानुसार २५ मे रोजी कुकडी धरणातून उन्हाळी दुसरे आवर्तन सोडण्यात येणार असल्याची माहिती आ. विक्रम पाचपुते यांनी दिली. 'एल निनो'मुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीत कुकडीचे पाणी सुटण्याची शक्यता अत्यंत कमी मानली जात होती. मात्र, श्रीगोंदा तालुक्याचे आ. विक्रमसिंह पाचपुते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री यांच्याशी साधलेल्या संवादातून हा सकारात्मक निर्णय झाला. सध्या कुकडी प्रकल्पात केवळ १७.६७ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असला, तरी शेतकऱ्यांच्या पिकांचा प्रश्न आणि पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन जलसंपदा विभागाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यामुळे श्रीगोंदा तालुक्यातील लाभक्षेत्रातील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. आ. पाचपुते यांनी, कुकडीचे आवर्तन मंजूर करून शेतकऱ्यांना दिलासा दिल्याबद्दल मुख्यमंत्री आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे मनःपूर्वक आभार मानले. पाणीसाठा मर्यादित आहे, त्यामुळे प्रत्येक थेंब सोन्यासारखा जपा. पाणी काटकसरीने वापरा आणि अपव्यय टाळा.'पाणी वाचवा, शेती वाचवा' हाच या आवर्तनाचा खरा संदेश ठरणार आहे. असे आ. पाचपुते म्हणाले.

## रणजित राऊत यांची आयसीएमआरच्या राष्ट्रीय प्रशिक्षणासाठी निवड




**माहिजळगाव :** जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथील रहिवासी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नीत अंबाजोगाई येथील योगेश्वरी महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागाचे जैवविविधता संशोधक व युवा शास्त्रज्ञ रणजित रावसाहेब राऊत यांची भारतीय आयुर्विज्ञान संशोधन परिषद (आय.सी.एम.आर.) प्रायोजित राष्ट्रीय प्रशिक्षण कार्यशाळेसाठी निवड झाली आहे. १८ मे ते २२ मे दरम्यान तामिळनाडू राज्यातील कोयंबतूर येथील कोंगुनाडू आर्टस् ्न्ड सायन्स कॉलेज येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. जिनोमीक ॲन्ड मेटाजीनोमीक प्रोचेस फॉर डिटेक्शन ॲन्ड ट्रॅकींग ऑफ ंटीमायक्रोबीयल रेजिस्टन्स पॅथोजन्स या विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळेत महाराष्ट्रातून या कार्यशाळेसाठी निवड झालेले रणजित राऊत हे एकमेव प्रतिनिधी आहेत. आयसीएमआरच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेत अत्याधुनिक प्रयोगशाळा तंत्रज्ञान, जैवमाहिती विश्लेषण आणि संशोधन पद्धतींबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळणार आहे. रणजित राऊत हे ग्रामीण भागात जैवविविधता संवर्धन, पर्यावरण जनजागृती, सेंद्रिय शेती, औषधी वनस्पती संवर्धन, मियावाकी वननिर्मिती आणि समुदाय सहभाग या क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांमध्ये सहभाग नोंदविला आहे. त्यांच्या या निवडीमुळे महाराष्ट्राच्या विज्ञान व संशोधन क्षेत्राचा गौरव झाला असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## कोथुळ, ढोरजे या दोन शिव रस्त्यांचे यशस्वी सीमांकन



**लिंपणगाव :** महसूल मंत्री. बावनकुळे साहेब यांच्या आदेशाचा सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे या ऐतिहासिक कामाची यशस्वी अंमलबजावणी करण्यात येत आहे. श्रीगोंदा-पारनेर उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर , तहसीलदार सचिन डोंगरे, भूमी उपअधीक्षक अविनाश मिसाळ तसेच राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांच्या उपस्थितीत मोजणी अधिकारी वासुदेव पाटील यांनी दि. १५ मे रोजी कोथूळ-घोटवी व घोटवी-ढोरजे या दोन शिव रस्त्यांचे यशस्वी सीमांकन पूर्ण केले. या ऐतिहासिक कामासाठी आ. विक्रमसिंह पाचपुते यांच्याकडून व सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व प्रशासनाकडून मोलाचे सहकार्य लाभले. याबद्दल शिव पानंद शेत रस्ता चळवळ यांच्यावतीने आ. पाचपुते, कर्मचारी व शेतकरी बांधवांचे आभार व्यक्त करण्यात आले. प्रत्येक गावातील शेतकऱ्यांनी रस्त्यांच्या कामासाठी एकजुटीने सहकार्य करावे, जेणेकरून आपल्या गावाचा, तालुक्याचा आणि पर्यायाने राज्याचा विकास अधिक वेगाने होईल. हे रस्ते शेतकऱ्यांच्या हक्काचे रस्ते आहेत.

## खानापूर ग्रामपंचायतची पंचायतराज पथकाकडून पाहणी



**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील खानापूर येथे पंचायतराज पथकाकडून ग्रामपंचायतची पाहणी करण्यात आली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत राबवलेल्या योजनांची पथकांकडून पाहणी करण्यात आली.केज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठलराव नागरगोजे, कृषीअधिकारी दिपक जोगदंड, ग्रामपंचायत विस्तार अधिकारी राहुल रोडेवार, सहाय्यक प्रशासन अधिकारी मनोज किंबहूने, तसेच तालुका व्यवस्थापक विजय निफ्टे यांचा या पथकात सहभाग आहे. शेवगाव तालुक्यातील ग्रामपंचायतींनी केलेल्या विविध विकासकामांची प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन या पथकाने तपासणी केली. गावातील सर्वांगीण विकास व शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच प्रशासकीय कामकाजाचा दर्जा पाहून समितीने समाधान व्यक्त केले. समितीने ग्रामपंचायत योजनांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी गावांमधील वृक्ष लागवड, गावामध्ये पिण्याचे पाणी, सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन, रस्ते, बंदिस्त गटार, अंगणवाडी स्वच्छता, जिल्हा परिषद शाळा स्वच्छता, स्मशानभूमी स्वच्छता, गावातील सीसीटीव्ही कॅमेरे,लोकसहभागातून व लोकवर्गणीतून झालेल्या अनेक कामांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. यावेळी शेवगाव पंचायत समितीचे विस्तार अधिकारी दादासाहेब शेळके, विस्तार अधिकारी सचिन भाकरे, विस्तार अधिकारी सुजित भोंग हे उपस्थित होते. तसेच सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, मा.पं. समिती सदस्य, ग्रामविकास अधिकारी, संगणक ऑपरेटर, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

# गुटखा माफियांवर पोलिसांचा धडक छापा

## २६ लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** अहिल्यानगरचे नूतन पोलीस अधीक्षक सुदर्शन मक्काम यांच्या आदेशानुसार श्रीगोंदा पोलीस स्टेशन हद्दीत अवैध गुटखा व पानमसाला विक्रेत्यांवर मोठी कारवाई करण्यात आली. लोणी व्यंकनाथ आणि आढळगाव परिसरात सुरू असलेल्या अवैध गुटखा विक्रीवर पोलिसांनी धडक छापेमारी करत सुमारे २६ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. गोपनीय माहितीच्या आधारे बेलवंडी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी नंदकुमार सोनवलकर आणि त्यांच्या पथकाने लोणी व्यंकनाथ येथे छापा टाकला. यावेळी प्रवीण सतीश गायकवाड यांच्या किराणा दुकान, गोदाम आणि क्रेटा कारमध्ये मोठ्या प्रमाणावर गुटखा व पानमसाला आढळून आला. तसेच शरद सिताराम वडवकर यांच्या दुकानातूनही अवैध गुटखा विक्री सुरू असल्याचे उघड झाले. दरम्यान, गुटखा पुरवठ्यासाठी आलेली मारुती सुझुकी कॅरी मालवाहतूक गाडी पकडण्यात आली. चालक नागेश नीलकंठ सुमकवर याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, हा माल रवी बबन दळवी (रोकडोबा चौक, श्रीगोंदा) यांच्या सांगण्यावरून आणल्याची माहिती समोर आली. पुढील तपासात आढळगाव शिवारातील अक्षय राजू होले याच्याकडेही गुटखा पोहोचविल्याचे निष्पन्न झाले.या कारवाईत चार ठिकाणी छापे टाकून ४ लाख ४० हजार २९६ रुपयांचा गुटखा व पानमसाला, तसेच २२ लाख रुपयांची क्रेटा, टोयोटा ग्लांजा आणि मारुती सुझुकी कॅरी अशी वाहने जप्त करण्यात आली. सदर कारवाईत शरद सिताराम वडवकर आणि नागेश नीलकंठ सुमकवर यांना ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास श्रीगोंदा पोलीस स्टेशन करत आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.आता गुटखा माफियांना श्रीगोंद्यात 'नो एंट्री', असा स्पष्ट संदेश या कारवाईतून पोलिसांनी दिला आहे.

## मुलीच खऱ्या अर्थाने कुटुंबाचा आधारवड : दीपक दरे

**नगर तालुका :** दहावी व बारावी परीक्षेत यंदाही मुलींनीच बाजी मारली आहे. मुली अत्यंत प्रामाणिक पणे कष्ट करतात. व त्याच खऱ्या अर्थाने कुटुंबाचा आधारवड बनतात असे प्रतिपादन जिल्हा मराठा संस्थेचे कार्यकारिणी सदस्य दिपक दरे यांनी केले. देहरे येथील नवभारत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा शनिवारी सकाळी आयोजित करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानावरून दरे बोलत होते. मुलांनी सध्याच्या काळात मोबाईलचा वापर कमी करावा. आज पाश्चिमात्य देश सुद्धा वह्या पुस्तकांकडे वळला आहे. नवभारत शाळेची प्रगती सर्वांच्या सहकार्याने सुरु आहे. जिल्हा मराठा संस्था कुठल्याही एका धर्माची नाही. विद्यार्थ्यांनी राजकारणाच्या नादी लागून आयुष्य बरबाद करण्यापेक्षा अभ्यासाकडे वळा असा संदेश दिपक दरे यांनी यावेळी दिला.

प्रास्ताविकातून प्रभारी प्राचार्य अंकुश बर्डे यांनी शाळेच्या प्रगतीचा तसेच निकालाचा लेखाजोखा मांडला. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. इयत्ता बारावीतील भाग्यश्री करंडे, ओम शिंदे, प्रणाली काळे, ऋषिकेश साबळे, समीक्षा काळे, सिद्धी निमसे तसेच इयत्ता दहावीतील उत्कर्षा काळे, अभिजित लांडगे, ऋतुजा पिंपळे, सार्थक पठारे, श्रद्धा धनवटे, मयूरी नवले तसेच तनुजा सतीश भवर या विद्यार्थ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. याप्रसंगी माजी प्राचार्य शिरीष टेकाडे, व्ही. डी. काळे सुरेश काका लांडगे,महेश म्हसे, यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सरपंच शीतल चोर, उपसरपंच प्रकाश लांडगे, अनिल लांडगे, दीपक करंडे, गोविंद काळे, अनिल करंडे, किसन धनवटे, नवनाथ करंडे, कुमार दळवी, नाना काळे आदिंसह ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते.

## गावरान आंब्याची झाडे नामशेष होणार ?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जातेगाव :** पूर्वी ग्रामीण भागातील शेताच्या बांधावर, वाड्यांमध्ये, घराशेजारी तसेच माळरान भागात मोठ्या प्रमाणात आढळणारी गावरान आंब्यांची विशाल झाडे आता हळूहळू नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र दिसून येत आहे. वाढती लोकसंख्या, जमिनीचे होत असलेले तुकडे, शेतीचे कमी होत चाललेले क्षेत्र आणि बदलती शेती पद्धती यामुळे ग्रामीण भागाची नैसर्गिक ओळख असलेली ही झाडे वेगाने नष्ट होत आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यातील अनेक गावांमध्ये एकेकाळी गावरान आंब्यांच्या बागा मोठ्या प्रमाणात होत्या. गावोगावी ही झाडे ग्रामीण संस्कृतीचे प्रतीक मानली जात होती. पूर्वीच्या काळात एक गावरान आंब्याचे झाड अर्धा ते एक गुंठा जागा व्यापत असे. ही झाडे आकाराने प्रचंड मोठी असून त्यांना दरवर्षी हजारोंच्या संख्येने आंबे लागत असत. विशेष म्हणजे या झाडांवर कोणत्याही प्रकारची रासायनिक फवारणी किंवा औषधांचा वापर केला जात नव्हता. नैसर्गिक पद्धतीने वाढलेले हे आंबे चवीला अत्यंत गोड, रसाळ आणि सुगंधी असायचे. गावातील लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच या गावरान आंब्यांची आतुरता असायची. सुमारे २० वर्षांपूर्वी ग्रामीण भागातील सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातही या आंब्यांच्या झाडांना मोठे महत्त्व होते. गावातील साखरपुडा, बैठका, जत्रा, भजन-कीर्तन तसेच विविध सामाजिक कार्यक्रम या मोठ्या आंब्यांच्या झाडाखालीच पार पडत असत. उन्हाळ्यात गावकरी झाडांच्या थंड सावलीत एकत्र येऊन गप्पा मारत, तर शेतकरी दिवसभराच्या कामानंतर याच झाडाखाली विश्रांती घेत असत. त्यामुळे गावरान आंब्यांची झाडे ही केवळ फळझाड नव्हती, तर गावच्या सामाजिक ऐक्याचे आणि संस्कृतीचे केंद्र होती.

मात्र बदलत्या काळात व्यापारी फायद्याच्या दृष्टीने अनेक शेतकरी कलमी आंबा, डाळिंब, ऊस तसेच इतर नगदी पिकांकडे वळले आहेत. मोठ्या गावरान झाडांमुळे जमीन व्यापली जाते, सावली पडते आणि उत्पादनात घट होते, या कारणांमुळे अनेक ठिकाणी जुनी झाडे तोडण्यात आली. लोकसंख्या वाढल्याने जमिनीचे तुकडे होत गेले आणि शेती क्षेत्र कमी होत असल्यानेही मोठ्या झाडांना जागा उरलेली नाही.

## कथांच्या शब्दातून उलगडले मानवी संवेदनांचे विश्व

### कथाकार परीट यांच्या प्रबोधनाने व्याख्यानमालेचा समारोप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**चिचोंडी पाटील :** कथा या केवळ शब्दांची मांडणी नसून त्या समाजाच्या भावना, संघर्ष, संस्कृती आणि परिवर्तनाचे प्रतिबिंब असतात. सामाजिक, नैतिक, राजकीय आणि सांस्कृतिक बदल कथांमधून जिवंत होत असतात. कथा माणसाला सामूहिक जगण्याचे भान देतात आणि जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी निर्माण करतात. असे परखड मत कथाकार बाबा परीट यांनी मांडले.

चिचोंडी पाटील येथे प्रबोधन मंच व स्वातंत्र्यवीर सावरकर वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रबोधन व्याख्यानमालेचा समारोप प्रख्यात कथाकार बाबा परीट यांच्या प्रभावी व्याख्यानाने झाला. कथा तुमच्या-आमच्या या विषयावर बोलताना त्यांनी कथांच्या माध्यमातून मानवी जीवनाचे यथार्थ दर्शन घडत असल्याचे सांगत कथा म्हणजे समाजजीवनाचा जिवंत आरसा असल्याचे प्रतिपादन केले.

प्रबोधन व्याख्यानमालेचे कौतुक करताना त्यांनी सांगितले की, अशा उपक्रमांमुळे गावाला वैचारिक दिशा मिळते. विविध विचारवंतांचे विचार ऐकण्याची संधी निर्माण होते आणि नव्या पिढीत सांस्कृतिक जाणीव जागृत होते. अवघ्या दोन वर्षांत या व्याख्यानमालेने उभा केलेला जनसागर पाहता ही परंपरा अनेक दशकांची वाटते, अशा शब्दांत त्यांनी आयोजकांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ययाती फिसके यांनी केले. स्वागत कु. सृष्टी पाचारणे यांनी तर सूत्रसंचालन आरिफ बेग यांनी केले. सामुदायिक पसायदानाने सांगता झाली.

## श्री क्षेत्र पिंपळनेर ते पंढरपूर
# पायी दिंडी पालखी सोहळा बैठक संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पारनेर :** राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्री संत निळोबाराय देवस्थानच्या आषाढी वारी पायी दिंडी पालखी सोहळ्याची बैठक दि.१३ मे रोजी सकाळी १० वाजता संपन्न झाली.

या बैठकीमध्ये सोहळ्यात चालणाऱ्या वारकऱ्यांसाठीच्या विविध सुविधा पूरविण्याबाबत चर्चा झाली. पालखी सोहळ्याची नियाजनाची बैठक सोहळा प्रमुख गोपाळकाका मकाशीर यांचे अध्यक्षतेखाली तर निळोबाराय संस्थांनचे अध्यक्ष अशोकराव सावंत यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. याप्रसंगी, देवस्थानचे व सेवामंडळाचे सर्व विश्वस्त, १०० दिंडीचालक, पिंपळनेर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले ब वर्ग तीर्थक्षेत्र असलेले श्री संत निळोबाराय महाराज यांची ९ व्या क्रमांकाची मानाची दिंडी म्हणून ओळख आहे.

सालाबादप्रमाणे याही वर्षी श्रीक्षेत्र पिंपळनेर ते पंढरपूर पायी दिंडी पालखी सोहळ्याचे प्रस्थान प्रसंगी ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णासाहेब हजारे, राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना सुनेत्राताई पवार, पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हाधिकारी पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक व लाखो वारकऱ्यांच्या उपस्थितीत दि. १० जुलैला सकाळी १०:३० वा. निळोबारायांच्या राहत्या वाड्यातून प्रस्थान होऊन दुपारी ३ वा. निळोबारायांच्या संजीवनी समाधी मंदिरातून पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. अशी माहिती श्री संत निळोबाराय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अशोकराव सावंत यांनी दिली.

चालू वर्षी रथासाठी दिंडी क्रमांक ८ रुई छत्रपती दिंडी सोहळ्याचे अध्यक्ष बंडू बापूराव साबळे यांजकडून बैलजोडीचे सौजन्य देण्यात आले. नगारा बैलगाडीसाठी सिद्धेश्वर पायी दिंडी सोहळा चे ह भ प अण्णासाहेब चत्तर यांस कडून बैलजोडी चे सौजन्य देण्यात आले. या नियोजन बैठकीला संपत त्रिंबक गाजरे पाटील, विजय गुगळे ,राजेंद्र पठारे, जवळे सेवा संस्थेचे अध्यक्ष नाथा रासकर, विठ्ठल मंदिर संस्था सचिव जवळे गोरख सालके, देवस्थान ट्रस्ट सचिव लक्ष्मण खामकर, सेवा संस्था ट्रस्ट सचिव चांगदेव शिर्के, माजी सरपंच पिंपळनेर भाऊसाहेब लंटाबळे, विणेकरी पांडुरंग रासकर, माजी सरपंच पिंपळनेर पांडुरंग सातपुते तसेच पिंपळनेर ग्रामस्थ व पालखी सोहळ्यात सहभागी होणारे दिंडी चालक अध्यक्ष व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## आखेगाव रस्त्यावरील वीजप्रश्न अखेर मार्गी; नवीन रोहित्र बसविले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अमरापुर :** आखेगाव रस्त्यावरील परिसरात नवीन रोहित्र बसविण्यात आले

शेवगाव : शहरातील प्रभाग क्र. ११ मधील खंडोबानगर व आखेगाव रस्त्यालगतच्या परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. परिसरातील नागरिकांनी ही समस्या नगरसेवक सुनिल काकडे यांच्याकडे मांडल्यानंतर त्यांनी तातडीने महावितरणकडे पाठपुरावा केला.

या मागणीची दखल घेत सहाय्यक अभियंता भाऊसाहेब पगारे यांनी नवीन १०० के.व्ही. क्षमतेचे रोहित्र बसविण्याची कार्यवाही पूर्ण केली. यापूर्वी या परिसरात २०० के.व्ही. क्षमतेचे रोहित्र कार्यरत होते. मात्र वाढत्या भारामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत होता.

नवीन रोहित्र बसविल्यामुळे परिसरातील वीजपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली निघण्यास मदत होणार असून नागरिकांनी नगरसेवक सुनिल काकडे तसेच महावितरण प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# अखेर सीनाचे उन्हाळी आवर्तन सुटले

## आ. रोहित पवार यांच्या बैठकीला यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** उन्हाच्या तीव्रतेमुळे कर्जत-जामखेड मतदारसंघातील शेती आणि पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न होत असून आमदार रोहित पवार यांनी शुक्रवारी शेतकऱ्यांसह पुण्यात सिंचन भवन येथे कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन कुकडी आणि सीनाचे आवर्तन सोडण्याची मागणी केली होती. त्यानुसार आज शनिवार सीना धरणाचे उन्हाळी आवर्तन सोडण्यात आले.

सध्या उन्हाची तीव्रता वाढत असल्यामुळे कर्जत-जामखेड मतदारसंघात पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर आ. रोहित पवार यांनी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच कुकडीचे दुसरे आवर्तन सोडण्याची तसेच सीनातून उचलण्यात येणाऱ्या पाण्यावर नियंत्रण ठेवण्याची आणि उन्हाळी दुसरे आवर्तन सोडण्याची मागणी केली होती. परंतु त्यावर कोणताही निर्णय झाला नाही. त्यामुळे आ. रोहित पवार यांनी पुण्यात सिंचन भवन येथे जलसंपदा विभागाच्या मुख्य अभियंता आणि इतर अधिकारी यांच्यासह शेतकऱ्यांची बैठक घेऊन कुकडी आणि सीनातून तातडीने दुसरे उन्हाळी आवर्तन सोडण्याची आग्रही मागणी केली. त्यांच्या या मागणीला यश आले अूसन बैठकीच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे शनिवारी सीनाचे दुसरे आवर्तन सोडण्यात आले आहे. याचा कर्जत तालुक्यातील तब्बल २१ गावांना शेतीसाठी, जनावरांसाठी आणि पिण्यासाठी फायदा होणार आहे. लाभक्षेत्रातील अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत हे आवर्तन पोहोचावे यासाठी ते किमान २१ दिवस सुरू ठेवण्याची मागणीही त्यांनी केली आहे. सीनाचे आवर्तन सोडण्यात आल्यामुळे पाण्याअभावी होरपळणाऱ्या पिकांना दिलासा



मिळणार आहेच पण पिण्याच्या पाण्याच्या निर्माण झालेल्या गंभीर प्रश्नातूनही दिलासा मिळणार आहे. याबाबत लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांकडून आ. रोहित पवार यांचे आभार मानण्यात येत आहेत.

दरम्यान, कुकडीचे दुसरे उन्हाळी आवर्तन सोडण्याची मागणीही आ. रोहित पवार यांनी केली होती. त्यानुसार २५ तारखेपर्यंत कुकडीचे आवर्तन सोडण्याचे अधिकाऱ्यांनी मान्य केले, परंतु पाण्याची गरज लक्षात घेता त्यापूर्वीच आवर्तन सोडण्याची मागणी आणि आग्रह आ. रोहित पवार यांनी धरला आहे. त्यामुळे कुकडीचे आवर्तन कधी सोडण्यात येते त्याकडेही कर्जत-जामखेड मतदारसंघातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

## अल्पवयीन तरुणीवर अत्याचार, पॉक्सो दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : इंस्टाग्रामवार ओळख झाल्याचा फायदा घेत एका अल्पवयिन तरुणीला बोलावून तिला मोटारसायकलवर नेवून लेंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. जानेवारी महिन्यात अत्याचाराची घटना घडली असून पीडित तरुणीने तक्रार दिल्यानंतर आरोपीविरुध्द पॉक्सो अंतर्गत वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ऋषिकेश उत्तम त्रिभुवन (रा. खंबाळा फाटा वैजापूर) असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील पीडित तरुणीची इंस्टाग्रामवार आरोपीशी ओळख झाली होती. त्यानंतर आरोपी त्रिभुवन याने तरुणीला फोनवर बोलावून मोटारसायकलवर घेऊन जात तिच्यावर अत्याचार केला. पिंक पथकाच्या पोलीस उप निरीक्षक मनिषा जगताप या अधिक तपास करीत आहेत.



# एलसीबीचा मोठा स्ट्राईक : बार-दुकाने फोडणारी आंतरराज्यीय टोळी जेरबंद

## पाच गुन्हे उघड; साडेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर परिसरातील बिअर बार व मद्यदुकाने फोडणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने अटक करत मोठे यश मिळविले आहे. या कारवाईत पाच गुन्हे उघडकीस आले असून ५ लाख ५५ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. घारगाव पोलीस ठाण्यात ३ मे २०२६ रोजी हॉटेल निलायम बार येथे चोरीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी किशोर बाळाजी डोके (रा. खंदरमाळवाडी, ता. संगमनेर) यांच्या बारचे शटर तोडून अज्ञात चोरट्यांनी ३ लाख ६ हजार १९० रुपये किमतीची विदेशी दारू, सिगारेट व सीसीटीव्ही डीव्हीआर चोरून नेला होता. पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे यांच्या पथकाने तांत्रिक तपास व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा शोध घेतला.




नाशिक येथील वडाळा परिसरातून हसन हमजा कुट्टी, आकाश सचिन सूर्यवंशी व मेहताब गुलाम रसुल अन्सारी यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांचा साथीदार बंटी दास (रा. झारखंड) फरार असल्याचे समोर आले. तपासादरम्यान चोरीचा माल पळसे (जि. नाशिक) येथील हॉटेल लकी बार अँड रेस्टॉरंटचे चालक किरण उगले व विवेक उगले यांना विकल्याचे उघड झाले.

पोलिसांनी किरण उगले यालाही ताब्यात घेतले आहे. या कारवाईत विदेशी दारू, टाटा इंडिका कार, कटर, मंकी मास्क, एअर पिस्टल व अन्य साहित्य असा एकूण ५.५५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील तपास घारगाव पोलीस करीत आहेत.

# महांकाळवाडगाव येथे अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

## मुद्देमाल एलसीबीने कडून जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील महांकाळवाडगाव परिसरात अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत एका आरोपीस ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून ट्रॅक्टर-ट्रॉलीसह एकूण ५ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार तसेच पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक संदिप मुरकुटे, भगवान थोरात, विशाल तनपुरे व रमीजराजा आत्तार यांच्या पथकाने ही कारवाई केली.शुक्रवारी दि.१५) मे २०२६ रोजी पहाटे श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग सुरू असताना पथकाला गुप्त माहितीदारामार्फत महांकाळवाडगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रातून ट्रॅक्टर-ट्रॉलीच्या सहाय्याने अवैधरित्या वाळू वाहतूक सुरु होती.त्या आधारे पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत सापळा रचला.या नदीपात्रातून वाळू भरून येणारा ट्रॅक्टर दिसताच पोलिसांनी त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला.मात्र, चालकाने वाहनासह पळ काढण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी पाठलाग संबंधितास ताब्यात करून घेतले.चौकशीत त्याने आपले नाव आकाश पुंजाहरी माकडे (वय २७, रा. डागपिंपळगाव, ता. वैजापूर,जि.छत्रपती संभाजीनगर) असे सांगितले.

पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून सुमारे १० हजार रुपये किमतीची एक ब्रास वाळू तसेच ५ लाख रुपये किमतीचा ट्रॅक्टर-ट्रॉली असा, एकूण ५ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

# शेतीच्या बांधाच्या वादातून बाप-लेकाला मारहाण, तिघांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शेतीच्या बांधाच्या जुन्या वादातून राहुरी तालुक्यातील तमनर आखाडा येथे बाप-लेकाला कोयता, लाकडी दांडा व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत बाळासाहेब भिमाजी तमनर (वय ३९, रा. तमनर आखाडा, ता. राहुरी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, त्यांचे चुलत भाऊ शंकर चिमाजी तमनर यांच्यासोबत शेतीच्या बांधावरून पूर्वीपासून वाद सुरू आहेत.

दि. ९ मे २०२६ रोजी सायंकाळी सातच्या सुमारास फिर्यादीचे वडील भिमाजी तमनर हे दूध घेऊन जात असताना देव नदीच्या ओढ्याजवळ आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत मारहाण केली. ही घटना समजताच बाळासाहेब तमनर तेथे गेले असता आरोपींनी दोघा बाप-लेकाला शिवीगाळ करून कोयता, लाकडी दांडा तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच शेताच्या बांधाबाबत पुन्हा काही बोललात तर जिवे मारून टाकू, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी राहुरी पोलिसांनी शंकर चिमाजी तमनर, चिमाजी पर्वत तमनर व पद्माबाई चिमाजी तमनर (सर्व रा. तमनर आखाडा, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११५(२), ११८(१), ११८(२), ३५१(२), ३५२, ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# १३ वर्षांनंतर शनी जयंती-अमावस्येचा दुर्मिळ योग; शनिशिंगणापूरात भाविकांचा महासागर

## सहा लाखांहून अधिक भाविकांचे दर्शन; प्रथमच सरकारी नियोजनात ‘शनियात्रा’



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : तब्बल १३ वर्षांनंतर शनी जयंती आणि शनी अमावस्येचा दुर्मिळ योग जुळून आल्याने शनिशिंगणापूर येथे भाविकांचा महासागर उसळला. महाराष्ट्रासह विविध राज्यांतून आलेल्या सहा लाखांहून अधिक शनिभक्तांनी शनिदेवाचे दर्शन घेत ‘जय शनिदेव’चा गजर केला.

यंदाची शनी अमावस्या २० तास २० मिनिटांची असल्याने दिवसभर तीव्र उन्हातही भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी कायम होती. या पार्श्वभूमीवर मंदिर प्रशासनाने मंदिर २४ तास खुले ठेवत चौथऱ्यावरील दर्शन बंद केले होते. विशेष म्हणजे, ६३ वर्षांनंतर प्रथमच सरकारी नियोजनातून ‘शनियात्रा’चे व्यापक स्वरूपात आयोजन करण्यात आले. वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी कांगोणी फाटा, मुळा कारखाना परिसर, ग्रामीण रुग्णालय परिसर आदी ठिकाणी सहा एकरांहून अधिक जागेत मोफत वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली होती.

देवस्थान प्रशासनासह ड. सयाराम बानकर, आर. एन. रेपाळे आणि मुळा कारखान्याने यासाठी सहकार्य केले. यात्रेदरम्यान २०० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे आणि ३०० सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले होते. नूतन पोलीस अधीक्षक सुदर्शन यांनी स्वतः उपस्थित राहून सुरक्षा व वाहतूक व्यवस्थेचा आढावा घेतला. महायुतीचे आमदार विठ्ठलराव लंघे, सुनील शिंदे, बाबाजी काळे, अमोल खताळ यांनीही यात्रेस भेट दिली.

विविध मान्यवरांच्या हस्ते पहाटे, दुपारी व सायंकाळी महाआरती पार पडली. दरम्यान, शिंगणापूर ग्रामपंचायतीने भाविकांसाठी मोफत गार पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, आरोग्य सुविधा, जंतुनाशक फवारणी व माहिती केंद्रांची व्यवस्था करून सेवा उपक्रम राबविला.

# नीट पेपरफुटीच्या तपासात राहुरी तालुका पुन्हा चर्चेत

## लोखंडेच्या चौकशीतून महत्त्वाचे धागेदोरे समोर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : नुकत्याच देशात नीट परीक्षेचा पेपर फुटल्याचा गोंधळ सुरू असतानाच नीट पेपरफुटी प्रकरणाचा तपास पुन्हा एकदा राहुरी तालुक्याकडे संशयाची सुई असल्याची माहिती समोर येत आहे. या प्रकरणी अटकेत असलेल्या धनंजय लोखंडे याच्या कडे केलेल्या चौकशीतून महत्त्वाचे धागेदोरे समोर आल्याने केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने गुरुवारी रात्री राहुरी तालुक्यातील महाडूक सेंटर (माहेगाव) येथील दोन तरुणांना ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहार प्रकरणात देवळाली प्रवरा येथील एका तरुणाचेही नाव पुढे येत असल्याची चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे, तपास यंत्रणांकडून धरपकड सुरू झाल्यापासून संबंधित तरुण देवळाली प्रवरा येथून गायब असल्याची माहिती समोर येत आहे.

समजलेल्या माहितीनुसार,धनंजय लोखंडे याच्या बँक खात्यांची तपासणी करताना राहुरी तालुक्यातील काही व्यक्तींशी मोठ्या आर्थिक व्यवहारांचे धागेदोरे समोर आले. त्यानंतर केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने स्थानिक पोलिसांच्या मदतीने कारवाई करत दोन तरुणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. मात्र अधिकृतरीत्या त्यांच्या नावांची माहिती समोर आलेली नाही. स्थानिक पोलिसांकडून या कारवाईस दुजोरा देण्यात आला आहे. मात्र त्या दोन तरुणांची नावे सांगण्यास स्पष्ट नकार दिला आहे. दरम्यान, नीट परीक्षेतील प्रकरणात कथित गैरव्यवहार देवळाली प्रवरा येथील एका तरुणाचेही नाव पुढे येत असल्याची चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे, तपास यंत्रणांकडून धरपकड सुरू झाल्यापासून संबंधित देवळाली प्रवरा येथून गायब असल्याची माहिती समोर येत आहे. यापूर्वी महाडूक सेंटर (माहेगाव) येथील धनंजय निवृत्ती लोखंडे याला केंद्रीय तपास यंत्रणांनी ताब्यात घेत चौकशी सुरू केली होती. त्यानंतर आता पुन्हा राहुरी तालुक्यातील संशयितांवर कारवाई सुरू झाल्याने नीट पेपरफुटी प्रकरणाचे जाळेअधिक खोलवर पसरल्याची चर्चा रंगू लागली असतानाच तालुक्यातील अजून यामध्ये कोण सहभागी आहे याकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे.

# विज्ञानाच्या प्रगतीत बैलगाडी इतिहास जमा

## घुंगरांचा मंजुळ आवाज नाहीसा

**शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : ग्रामीण भागातील जीवनाचा अविभाज्य भाग असलेली बैलगाडी आज हळूहळू इतिहासाच्या पानांमध्ये जमा होताना दिसत आहे. घुंगरांचा मंजुळ आवाज करत मातीच्या नागमोडी रस्त्यावरून डौलाने धावणारी बैलगाडी म्हणजे गावाकडच्या संस्कृतीचं जिवंत प्रतीक होतं. चाकांची खडखड, बैलांचा रुबाब आणि गाडीत बसलेल्या मुलांचा आनंद हा ग्रामीण जीवनाचा अविस्मरणीय भाग होता. मात्र बदलत्या काळासोबत ही ओळख आता विरळ होत चालली आहे. पूर्वी शेतीपासून दळणवळणापर्यंत प्रत्येक कामासाठी बैलगाडीला मोठं महत्त्व होतं.



> सध्या काही भागात इंधन दरवाढ आणि खर्चामुळे पुन्हा बैलगाडी रस्त्यावर दिसू लागली असली, तरी ती संख्या अत्यंत मर्यादित आहे. तालुक्यात हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्याच बैलगाड्या उरल्या आहेत. त्यामुळे येणाऱ्या पिढीला बैलगाडी प्रत्यक्ष पाहण्याऐवजी ती फक्त पुस्तकांमध्येच पहावी लागेल.
>
> **नाना थोरात, बेलापूर**

गावात घरासमोर बैलगाडी उभी असणे ही प्रतिष्ठेची बाब मानली जायची. देवदेवतांच्या मिरवणुका, नवरदेवाची वरात, शेतमालाची वाहतूक अशा प्रत्येक ठिकाणी बैलगाडीचा मान होता. शिवारातील चिखलमय वाटा असोत किंवा मातीचे कच्चे रस्ते, बैलगाडीच ग्रामीण भागातील ‘सुपरफास्ट एक्सप्रेस’ म्हणून ओळखली जात होती. मात्र विज्ञानाच्या प्रगतीसोबत गावोगावी पक्के रस्ते झाले, ट्रॅक्टर, टेम्पो आणि मालवाहू वाहनांचा वापर वाढला. शेतीची कामे वेगाने होऊ लागली आणि बैलगाडी मागे पडत गेली. शेती व्यवसायही कमी होत गेल्याने अनेकांनी बैलगाड्या घरासमोर सांगाड्यासारख्या उभ्या करून ठेवल्या आहेत. काही ठिकाणी तर बैलगाडी पाहणेही दुर्मीळ झाले आहे.

पूर्वी सुतारांच्या हातातून तयार होणाऱ्या लाकडी बैलगाड्या ही एक कलाकृतीच असायची. सागाच्या लाकडापासून बनवलेली चाके, तुब आणि मजबूत सांगाडा तयार करण्यासाठी मेहनत घेतली जायची. पुढे वेल्डिंग मशीन आणि यांत्रिकीकरणामुळे लोखंडी बैलगाड्या बाजारात आल्या. त्यानंतर पारंपरिक लाकडी बैलगाड्यांना उतरती कळा लागली. आजही अनेकांच्या मनात बैलगाडीच्या आठवणी ताज्या आहेत. गावातील एखादी बैलगाडी आली की त्यात बसून जाण्याचा आनंद काही वेगळाच होता, अशी भावना अनेक ज्येष्ठ व्यक्त करतात.

त्या आठवणी आजही गावाकडच्या मातीशी जोडून ठेवतात.

# कोंबड्या शेतात गेल्याने पती-पत्नीला मारहाण



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : कोंबडी शेतात गेल्याचा कारणावरुन आरोपींनी पती पत्नीला शिवीगाळ करत लाकडी काठी व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली.

तसेच कुऱ्हाड मारून जखमी केली. ही घटना राहुरी तालुक्यातील कोळेवाडी येथे दि. १२ मे रोजी रात्रीच्या सुमारास घडली. संगिता राजेंद्र कोरडे,(वय ३५ वर्षे), ह्या राहुरी तालुक्यातील कोळेवाडी, म्हैसगाव येथे रहावयास असुन त्यांचा भाया दत्तु दामोधर कोरडे हा त्याच्या कुटुंबासह शेजारीच रहावयास आहे. दि. १२ मे २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास संगिता कोरडे यांची कोंबडी दत्तु कोरडे याच्या शेतात गेली होती. तेव्हा दोघात किरकोळ बाचाबाची झाली होती.

रात्री ९.३० वाजे दरम्यान संगिता कोरडे व त्यांचे पती राजेंद्र कोरडे हे त्यांच्या घरासमोर बोलत बसले होते. त्यावेळी तेथे आरोपी आले आणि सायंकाळी झालेल्या बाचाबाचीच्या कारणावरुन म्हणाले की, तुम्हाला जास्त झाले काय? तेव्हा पती पत्नी समजावुन सांगत असताना आरोपींनी दोघा पती पत्नीला शिवीगाळ करत लाकडी काठी व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. तसेच कुऱ्हाड मारून जखमी केले. तसेच तुम्ही माझ्या नादी लागले तर तुम्हाला तसेच तुमच्या संपुर्ण कुटुंबाला जिवे ठार मारुन टाकीन, अशी धमकी दिली. घटने नंतर संगिता राजेंद्र कोरडे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

त्यानुसार आरोपी दत्तु दामोधर कोरडे, किरण दत्तु कोरडे, उषा दत्तु कोरडे, भाऊसाहेब कांबळे, सर्व रा. कोळेवाडी, ता. राहुरी, या चार जणांवर गुन्हा रजि. नं. ५०६/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ११८ (१), ३५१ (२), ३५२, ३ (५) प्रमाणे शिवीगाळ, मारहाण व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे करीत आहेत.

